'लव्ह जिहाद' या आतंकवादापासून हिंदु तरुणींचे रक्षण करा !

लव्ह जिहाद

लेखक
श्री. रमेश हनुमंत शिंदे
श्री. मोहन अज्जू गौडा

नैराश्यातून आत्महत्या

वेश्याव्यवसाय

जिहादसाठी वापर

हिंदु जनजागृती समिती

'लव्ह जिहाद' या आतंकवादापासून हिंदु तरुणींचे रक्षण करा !

लव्ह जिहाद

लेखक

- श्री. रमेश हनुमंत शिंदे
- श्री. मोहन अज्जू गौडा

हिंदु जनजागृती समिती

प्रकाशक : सनातन भारतीय संस्कृती संस्था, खोली क्र. १०३, सनातन आश्रम, सनातन संकुल, पोस्ट - 'ओएन्‌जीसी', देवद, तालुका पनवेल, जिल्हा रायगड (महाराष्ट्र) ४१० २२१. **दू.क्र.** : (०२१४३) २३३१२०

© प्रकाशक

प्रथम आवृत्ती : गुढीपाडवा, कलियुग वर्ष ५११३ (४ एप्रिल २०११)

दुसरी आवृत्ती : स्वा. सावरकर जयंती, कलियुग वर्ष ५११३ (२३ मे २०११)

तिसरे पुनर्मुद्रण: अनंत चतुदर्शी, कलियुग वर्ष ५११३ (११ सप्टेंबर २०११)

तिसऱ्या पुनर्मुद्रणाच्या २५ सहस्र प्रती आणि तत्पूर्वीच्या केवळ ४ मासांत ९५ सहस्र प्रती प्रकाशित !

मुद्रणस्थळ : मंजुळा ऑफसेट प्रिंटर्स, कोल्हापूर

अर्पणमूल्य : रु. १५/- (Rs. 15/-) **ISBN** 978-93-81342-27-5

Scanned by CamScanner

अनुक्रमणिका

१. उत्पत्ती आणि अर्थ ३

२. समानार्थी शब्द ३

३. उगम ४

४. उद्देश ८

५. 'लव्ह जिहाद'चे लक्ष्य (टारगेट) ९

६. 'लव्ह जिहाद'मागील प्रेरणा आणि कट १२

७. हिंदु तरुणींभोवती प्रेमपाश आवळण्याच्या योजनाबद्ध पद्धती १३

* 'वशीकरण' करणे आणि त्याचा प्रभाव नष्ट करण्याचा उपाय १८

८. 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या हिंदु स्त्रियांची होणारी परवड १९

* वेश्याव्यवसायासाठी वापर * इस्लामी राष्ट्रांत विक्री १९

* जिहादी कारवायांसाठी वापर * नैराश्यातून आत्महत्या २०

९. 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या काही मुलींच्या दुर्दैवी कहाण्या २१

१०. व्याप्ती : राज्यस्तरीय, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय २२

११. 'लव्ह जिहाद' वेगाने फोफावण्यामागील काही कारणे ३५

१२. हिंदु तरुणींनो, खोट्या प्रेमाला बळी पडू नका ! ३८

१३. हिंदु तरुणींनी आणि स्त्रियांनी घ्यावयाची दक्षता ३९

१४. हिंदु पालकांनी घ्यावयाची दक्षता ३९

* लहानपणापासून मुलीला धर्मशिक्षण देऊन सुसंस्कारित करा ! ४०

* 'लव्ह जिहाद'ला बळी पडू शकणाऱ्या वा पडलेल्या मुलीचे रक्षण ४१

१५. हिंदु समाजाला आवाहन ४२

१६. हिंदु धर्मगुरूंना आवाहन ! ४३

१७. 'लव्ह जिहाद'ला आळा घालण्याचे उपाय ४३

टीप : या पुस्तकात अन्य संदर्भग्रंथ, तसेच नियतकालिके आदींतून घेतलेल्या लिखाणाच्या अंती कंसात संदर्भक्रमांक घातले असून त्याचे विवरण शेवटी 'संदर्भसूची'मध्ये दिले आहे. त्या सर्वांचे आम्ही आभारी आहोत.

Scanned by CamScanner

लव्ह जिहाद

१. उत्पत्ती आणि अर्थ

१ अ. उत्पत्ती : 'लव्ह जिहाद' हा शब्द 'लव्ह' + 'जिहाद' या अनुक्रमे इंग्रजी आणि अरबी शब्दांपासून बनला आहे.

१ आ. अर्थ

१. 'लव्ह' म्हणजे प्रेम. हे प्रेम 'जिहाद'चा हेतू साध्य करण्यासाठी असल्याने ते फसवे असते.

२. 'जिहाद' म्हणजे सर्व जगावर इस्लामी राज्य प्रस्थापित करण्यासाठी मुसलमानांनी इस्लाम धर्म न मानणाऱ्यांविरुद्ध पुकारलेले युद्ध.

'लव्ह जिहाद' म्हणजे 'मुसलमानांनी फसव्या प्रेमाच्या माध्यमातून हिंदु आणि ख्रिस्ती समाजांविरुद्ध पुकारलेले युद्ध', असे सर्वसाधारणपणे म्हणता येईल.

१ इ. हिंदु मुलींना 'मुसलमान मुले प्रसवण्याची यंत्रे' बनवणारी इस्लामी चळवळ ! : 'लव्ह जिहाद' ही हिंदु मुलींना प्रेमात फसवून त्यांना इस्लाम धर्म स्वीकारायला लावणे आणि त्यांचा 'मुसलमान मुले प्रसवण्याची यंत्रे' म्हणून उपयोग करणे, अशा प्रकारची चळवळ आहे.' - 'मिड-डे' सायंदैनिक, मुंबई. (३०.१०.२००९) [१]

१ ई. अयोग्य अर्थ - 'लव्ह जिहाद' म्हणजे 'आंतरधर्मीय प्रेमविवाह' ! : हिंदु तरुणी आणि मुसलमान तरुण यांच्या विवाहाला 'आंतरधर्मीय प्रेमविवाह' या गोंडस नावाने हिंदु धर्मातील तथाकथित धर्मनिरपेक्षतावादी मंडळी संबोधतात. 'प्रेमविवाह' आणि 'लव्ह जिहाद' यांतील भेद सांगतांना 'विश्व हिंदु महासंघा'चे उपाध्यक्ष महंत सुरेंद्रनाथ अवधूत म्हणतात, "प्रेमविवाहामध्ये उभयतांमध्ये निष्ठा आणि समर्पण असते. 'लव्ह जिहाद'मध्ये मात्र प्रेमाच्या ठिकाणी आक्रोश आणि विद्वेष असतो." यावरून 'लव्ह जिहाद' म्हणजे 'शुद्ध फसवणूक करणारा आंतरधर्मीय शरीरसंबंध' आहे, हेच लक्षात येईल.

२. समानार्थी शब्द

इंग्लंडमध्ये हे कारस्थान 'रोमिओ जिहाद' या नावाने ओळखले जाते.

Scanned by CamScanner

३. उगम

३ अ. इस्लामी आक्रमक आणि मोगल सम्राट : 'गेली तेराशे वर्षे धार्मिक उद्देशाने प्रेरित झालेल्या मुसलमानांनी हिंदु मुलींशी प्रेमाने किंवा बलप्रयोगाद्वारे 'निकाह' (विवाह) केलेले आहेत. इस्लामी आक्रमकांनी हिंदु स्त्रियांचे बलपूर्वक धर्मांतर करून त्यांना बुरखा परिधान करणाऱ्या 'बेगमा' (पत्नी) बनवले किंवा अंतःपुरात (जनानखान्यात) डांबले, हा इतिहास आहे.' (२)

हिंदु स्त्रियांच्या तत्कालीन स्थितीचे यथार्थ वर्णन करतांना समर्थ रामदासस्वामी लिहितात –

किती गुज्रिणी, ब्राह्मणी भ्रष्टवील्या । किती शांमुखी जाहजी फाकवील्या ।
कितीयेक देशांतरी त्या विकील्या । किती सुन्दरा हाल होवोनि मेल्या ।।

भावार्थ : (मुसलमान आक्रमकांनी) कित्येक हिंदु स्त्रिया भ्रष्ट केल्या, कित्येक हिंदु स्त्रिया नौकांत घालून नेल्या, कित्येक हिंदु स्त्रिया परदेशांत विकल्या अन् कित्येक हिंदु स्त्रिया हाल हाल होऊन मरण पावल्या.

वरील वर्णनाची साक्ष देणारी हिंदुस्थानवरील इस्लामी आक्रमकांची काही उदाहरणे पुढे दिली आहेत.

३ अ १. महंमद बिन कासीम : 'वर्ष ७१२ मध्ये आलेला हा मुसलमान लुटारू हिंदुस्थानातील लाखापेक्षा अधिक हिंदु तरुणी 'लूट' म्हणून अफगाणिस्तानात घेऊन गेला. याने काबूल आणि कंदाहार येथील पेठांत (बाजारांत) अक्षरशः वस्तूंचा लिलाव करावा, तसा लिलाव करून त्या हिंदु तरुणी विकल्या.' (३)

३ अ २. गझनीचा महंमद : 'याने मथुरा लुटल्यानंतर त्या लुटीसह ७० सहस्र तरुण हिंदु स्त्रिया इस्लामी राष्ट्रांत पाठवल्या. वर्ष १०१४ मध्ये त्याने ठाणेश्वर लुटले, तेव्हा त्या लुटीसह दोन लाख तरुण हिंदु स्त्रिया नेल्या. गझनी येथे प्रत्येक लुटीसह नेण्यात आलेल्या हिंदु स्त्रियांची एकूण संख्या ४ लाखांपेक्षा अधिक आहे. उझबेकिस्तानमधील मुसलमान हे याच हिंदु स्त्रियांच्या पोटी जन्मलेली संतती आहेत, असे म्हणतात. महंमदाने गझनी येथील बाजारपेठेत एका मोठ्या स्तंभावर 'दुख्तरे हिंदोस्तान, नीलामे दो दिनार ।' या ओळी लिहिल्या होत्या. 'हिंदुस्थानातील स्त्रियांचा येथे दोन दिनारांत लिलाव (विक्री) होईल', असा त्याचा अर्थ आहे.' (४)

Scanned by CamScanner

३ अ ३. अल्लाउद्दीन खिलजी : 'याने राजा रामदेव राय याला पराभूत करून त्याची आठ वर्षांची कन्या, तसेच शेकडो हिंदु स्त्रिया यांच्यावर अत्याचार केले. वर्ष १२९९ मध्ये गुजरातवरील स्वारीत अल्लाउद्दीनने तेथील राजा करण वाघेला याची राणी कमलादेवी हिला स्वतःची 'बेगम' बनवले. चितोडची राणी पद्मिनी हिच्या सौंदर्या-विषयी कळल्यावर याने चितोडवर स्वारी केली. त्या वेळी शीलहरण होऊ नये; म्हणून राणी पद्मिनीसह ८,००० स्त्रियांनी जोहार (अग्नीत समर्पित होऊन प्राणत्याग) केला.

३ अ ४. हुमायून : हा बाबराचा कुपुत्र हिंदूंच्या लग्नाच्या वरातीतूनच नववधूला पळवून नेत असे.' (५)

३ अ ५. अकबर : 'याने रजपूत जोधाबाईचे केलेले अपहरण, ही एक प्रकारची 'लव्ह जिहाद'ची ऐतिहासिक लहान आवृत्तीच होती', असे प्रसिद्ध इतिहासकार बिपीन चंद्रा यांचे मत आहे. मोगल साम्राज्याला सर्वाधिक धोका शूर रजपुतांपासूनच होता. हा धोका नष्ट व्हावा, यासाठी मनात कपट ठेवून अकबराने जोधाबाईचे अपहरण केले.' - ममता त्रिपाठी, स्तंभलेखक (६)

३ अ ५ अ. अकबराने बळाने पळवून आणलेली जोधाबाई ही हिंदु धर्माचे पालन करत असल्याचे सांगितले जाणे, ही शुद्ध थाप ! : 'अकबराची राणी जोधाबाई अखेरपर्यंत हिंदु धर्माचे पालन करत होती. जोधाबाई नित्य पूजा-अर्चा करी आणि तिला प्रसन्न ठेवण्यासाठी अकबर त्या पूजा-अर्चेत कपाळाला गंध लावून सहभागी होई', अशा कथा नेहमी सांगितल्या जातात. या कथा सांगणारे 'मुगले आझम', 'अनारकली' आणि 'जोधा-अकबर' असे चित्रपटही निघाले. या कथा म्हणजे शुद्ध इस्लामी थापा आहेत. 'तबकात अकबरी' या अकबरकालीन ग्रंथाप्रमाणे अकबराने जोधाबाईशी इस्लामी पद्धतीने निकाह केला होता. निकाहाच्या वेळी ती मुसलमान झाली आणि तिचे नाव मरीयम जमानी ठेवण्यात आले होते. फत्तेपूर सिक्री येथील तिच्या महालाचे नाव 'मरीयमका महल' असे होते. मृत्यूनंतर तिचे इस्लामी पद्धतीप्रमाणे आग्राजवळील ख्वाजाकी सरई येथे दफन केले गेले.' (७)

३ आ. चित्रपटसृष्टी

३ आ १. 'लव्ह जिहाद'ची प्रेरणा देणाऱ्या चित्रपटांच्या निर्मितीमागे पाकची गुप्तचर संस्था : 'भारतीय समाजावर चित्रपटांचा असलेला प्रभाव हेरून

Scanned by CamScanner

पाकची गुप्तचर संस्था 'आयएस्आय'ने 'लव्ह जिहाद'ला अनुकूल वातावरणनिर्मिती करण्यासाठी १९९० पासून गुन्हेजगताचा माफिया दाऊद इब्राहीमच्या माध्यमातून भारतीय चित्रपटसृष्टीत पैसा गुंतवण्यास आरंभ केला.' (८)

या मंडळींनी चित्रपट निर्मात्यांना 'मुसलमान नायक आणि हिंदु नायिका' अशी जोडी असलेले चित्रपट निर्माण करण्यास भाग पाडले. अशा चित्रपटांत मुसलमान नायकांसमवेत (उदा. इमरान हाश्मी, सैफ अली खान, फरदीन खान, सलमान खान यांच्या समवेत) हिंदु नायिकांची प्रणयदृश्ये जाणीवपूर्वक दाखवून हिंदु तरुणींच्या मनात अनैतिक प्रेमभावना जागवल्या जातात. त्यामुळे मोठ्या पडद्यावर दिसणारा मुसलमान नायक आपल्याच परिसरातील मुसलमान युवकात शोधण्याचा प्रयत्न हिंदु तरुणी करतात. त्याचा परिणाम म्हणजे आता हिंदु तरुणींना मुसलमानांशी प्रेमाचे चाळे करण्यात किंवा त्यांच्याशी विवाह करण्यात काहीच अनुचित (गैर) वाटत नाही.

याउलट चित्रपटात 'हिंदु नायक आणि मुसलमान नायिका यांचे प्रेम', असा विषय असल्यास ते मुसलमानांना खटकते आणि ते त्या चित्रपटाला संघटितपणे विरोध करतात. 'बॉंबे' चित्रपटाच्या वेळी असे घडले होते.

३ आ २. 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेले चित्रपटसृष्टीतील हिंदु कलाकार !

३ आ २ अ. शर्मिला टागोर : या बंगाली चित्रपट अभिनेत्रीने टायगर अली खान पतौडी या क्रिकेटपटूशी विवाह केला. विवाहाच्या वेळी शर्मिला टागोर यांचे धर्मांतर करून त्यांचे 'बेगम आयेशा सुल्ताना' असे नामकरण करण्यात आले. अभिनेता 'सैफ' आणि अभिनेत्री 'सोहा' ही त्यांची मुले धर्माने मुसलमान आहेत.

३ आ २ आ. सुशीला चरक : हिने चित्रपट पटकथाकार सलीम खान यांच्याशी विवाह केल्यानंतर त्या 'सुशीला' न रहाता 'सलमा' झाल्या. त्यांनी तीन मुलांना जन्म दिला. आज अभिनेता असलेली त्यांची सलमान, अरबाज आणि सोहेल ही तीन मुले धर्माने मुसलमान आहेत.

३ आ २ इ. गौरी छिब्बर : कर्नल रमेशचंद्र छिब्बर यांची कन्या असलेल्या या चित्रपट निर्मातीने घरचा विरोध असतांना शाहरूख खानशी विवाह केला.

३ आ २ ई. रीना दत्त आणि किरण राव : आमीर खान या अभिनेत्याने प्रथम रीना दत्त या चित्रपट निर्मातीशी विवाह केला. दोन मुले झाल्यानंतर त्याने रीना दत्तशी

Scanned by CamScanner

असलेला १५ वर्षांचा संसार मोडीत काढत तिला घटस्फोट दिला आणि किरण राव या चित्रपट दिग्दर्शिकेशी विवाह केला. दूरचित्रवाहिनीवरील एका भेटवार्तेत बोलतांना आमीर खान याने 'माझी पत्नी जरी हिंदु राहिली, तरी माझी मुले मुसलमान म्हणून ओळखली जातील', असे स्पष्टपणे सांगितले होते. त्याचा मुलगा आणि मुलगी यांची नावे मुस्लीम पद्धतीची आहेत.

३ आ २ उ. अमृता सिंग : हिने सैफ अली खान या अभिनेत्याशी विवाह केला.

या इतिहासाचा निष्कर्ष म्हणजे हिंदु तरुणीने मुसलमान पुरुषाशी विवाह केला, तर तिला इस्लाम धर्माचेच पालन करावे लागते आणि तिच्या पोटची मुले पुढे 'इस्लामचेच बंदे' होतात.

३ आ ३. अन्य

३ आ ३ अ. 'लव्ह जिहाद', हेच ज्येष्ठ इंग्रजी लेखिका कमला दास यांनी इस्लाम पंथ स्वीकारण्यामागील कारण ! : 'कमला दास यांनी १९९९ मध्ये वयाच्या ६५ व्या वर्षी इस्लामचा स्वीकार केला आणि 'कमला सुरय्या' असे मुस्लीम नाव धारण केले. त्यांचा सहलेखक म्हणून काम करणाऱ्या एका ३० वर्षीय प्राध्यापक असलेल्या मुसलमानाने त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढले. मोठा गाजावाजा करत त्यांनी इस्लाम पंथ स्वीकारला. इस्लाम स्वीकारताच त्यांनी घरातील सर्व हिंदु देवतांची चित्रे काढून टाकली. २००६ मध्ये 'द हिंदु' या वृत्तपत्राला दिलेल्या एका भेटवार्तेमध्ये कमला दास यांनी आपण धर्मपरिवर्तन करून पुष्कळ काही गमावल्याची स्वीकृती दिली होती.' - डॉ. श्रीरंग गोडबोले, पुणे (९)

'कमला दास यांना पुन्हा हिंदु धर्मात परत येण्याची इच्छा होती; पण असे केल्याने त्यांच्या जिवाला धोका होण्याची शक्यता असल्याने त्यांच्या मोठ्या मुलाने त्यांना तसे न करण्यास सांगितले. कमला दास यांना त्यांच्या सहलेखक मुसलमानाने इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी आखाती राष्ट्रातून आलेले १ कोटी रुपये दिले होते. याविषयी माझ्याकडे कागदी पुरावा नसला, तरी ही गोष्ट त्यांनी स्वतः मला सांगितली होती. कमला दास या सुप्रसिद्ध लेखिका असल्याने केरळमध्ये 'लव्ह जिहाद'ला अनुकूल वातावरण होण्यासाठी तसे केले असावे. निकाह केल्यानंतर ते दोघे एकत्र राहिले नाहीत.' - सौ. लीला मेनन, संपादिका, जन्मभूमी (मल्याळम दैनिक). (१०)

Scanned by CamScanner

४. उद्देश

४ अ. जगाचे इस्लामीकरण करणे

१. हिंदु तरुणींचे इस्लामीकरण करून हिंदु वंशवृद्धीचा एक स्रोत नष्ट करणे

२. हिंदु तरुणींशी विवाह केल्यानंतर अनेक अपत्ये जन्माला घालून इस्लामी वंशवृद्धी करणे

३. विवाहानंतर हिंदु तरुणींचा जिहादी कारवाया आणि शस्त्रास्त्र-तस्करी यांसाठी वापर करणे

४. विवाहानंतर अनेक अपत्ये जन्माला घालून त्यांचा आत्मघातकी पथकांसाठी वापर करणे

वरील उद्देशांमागील अंतिम उद्देश 'जगाचे इस्लामीकरण करणे', हाच आहे, हे कोणाच्याही लक्षात येईल.

४ आ. आर्थिक लाभ मिळवणे

१. प्रेमात ('लव्ह जिहाद'मध्ये) फसलेल्या तरुणींची अश्लील छायाचित्रे प्रसारित करून त्याद्वारे पैसा मिळवणे

२. प्रेमात फसलेल्या तरुणींची अश्लील छायाचित्रे काढून त्यांना प्रतिमाहनन (ब्लॅकमेल) करण्याची धमकी देऊन पैसा उकळणे

३. वेश्यालयात त्यांची विक्री करून त्याद्वारे पैसा कमावणे

४. आखाती (अरब) आणि इस्लामी राष्ट्रांत धर्मांतरित हिंदु तरुणींची विक्री करून भरपूर पैसा कमावणे.

४ इ. वासनातृप्ती : प्रेमाचे नाटक करून हिंदु तरुणींशी शारीरिक संबंध ठेवून स्वतःची वासनातृप्ती करणे

४ ई. मुसलमानांनी हिंदु स्त्रियांना पळवण्यामागील स्वा. सावरकरांनी सांगितलेले एक कारण ! : 'हिंदूंच्या लक्षावधी स्त्रियांचे मुसलमानांनी अपहरण करण्याचा जो त्या कालखंडातील शतकोशतके धुमाकूळ घातलेला होता, त्याला नुसते धर्मवेड म्हणून हेटाळण्याइतकी किंवा त्यास अनुल्लेखाने दुर्लक्षण्याइतकी ती गोष्ट तुच्छ नव्हती. वस्तूतः मुसलमानांचे ते 'धर्मवेड' एक वेड नव्हते, तर एक

Scanned by CamScanner

अटळ सृष्टीक्रमाला अनुसरून (महिलांमधील जननक्षमता जाणून) अंगीकारलेली त्यांची संख्या वाढवण्याची परिणामकारक पद्धत होती.' - स्वा. सावरकर (१९६३)

५. 'लव्ह जिहाद'चे लक्ष्य (टारगेट)

५ अ. हिंदु तरुणी : 'लव्ह जिहाद'चे मुख्य लक्ष्य हिंदु तरुणी हेच आहे. हिंदु तरुणींना आमिषे दाखवून आणि गोड बोलून प्रेमसंबंध निर्माण केले जातात.

५ अ १. 'हिंदु मुलींना बाटवा, प्रतिदिन २०० रुपये मिळवा !', अशा आशयाचा 'फतवा' ! : 'संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मुसलमान मौलवींकडून 'लव्ह जिहाद'साठी 'प्रतिदिन २०० रुपये घ्या आणि हिंदु मुलींना बाटवा', असा 'फतवा' काढण्यात आला आहे. त्यानुसार हिंदु मुलींना पटवण्यासाठी मुसलमान मुलांना प्रतिदिन २०० रुपये देण्यात येतात. हिंदु मुलीला पटवल्यावर त्यांना एक दुचाकी वाहन आणि तिच्याशी निकाह (लग्न) केल्यावर एक-दोन लाख रुपये दिले जातात. - दैनिक तरुण भारत, सोलापूर. (२२.२.२००९)

५ अ २. हिंदु मुलींना बाटवण्यासाठी जात, तसेच प्रांत यांनुसार लाखो रुपये देणारे 'मुस्लीम युथ फोरम' ! : 'मुस्लीम युथ फोरम' या संघटनेने हिंदु मुलींची गटवारी केली असून त्यानुसार हिंदु मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढणाऱ्या मुसलमानाला पुढीलप्रमाणे पैसे दिले जातात.

प्रेमजालात फसवलेल्या तरुणीची जात / प्रांत	'लव्ह जिहादी'ला मिळणारे रुपये
१. शीख तरुणी	७ लक्ष
२. पंजाबी हिंदु तरुणी	६ लक्ष
३. गुजराती ब्राह्मण तरुणी	६ लक्ष
४. ब्राह्मण तरुणी	५ लक्ष
५. क्षत्रिय तरुणी	४ लक्ष ५० सहस्र
६. गुजराती कच्छी तरुणी	३ लक्ष
७. जैन / मारवाडी तरुणी	३ लक्ष
८. मागासवर्गीय / अनुसूचित जातीची तरुणी	२ लक्ष
९. बौद्ध तरुणी	१ लक्ष ५० सहस्र' (११)

Scanned by CamScanner

५ अ ३. गावातून नगरात (शहरात) आलेल्या हिंदु मुलींच्या मागे लागण्यास प्राधान्य ! : 'गाव सोडून नगरात आलेल्या मुलींवर मुसलमानांचे प्राधान्यक्रमाने लक्ष असते. नगरातील राहणीमानाला जुळवून घेण्यासाठी त्यांना उंची कपडे आणि वस्तू यांची आवश्यकता असली, तरी त्यासाठी त्यांच्याकडे पैसे नसतात. अशा मुलींचा शोध घेऊन त्यांना पैसे दिले जातात, तसेच धुम्रपान, मद्य आदींचे व्यसन लावले जाते. 'लव्ह जिहाद'ला फसलेल्या अशा मुली मग अन्य हिंदु मुलींना फसवण्यासाठी साहाय्य करतात.' (१२)

५ आ. हिंदु विवाहित महिला : अलीकडे हिंदु तरुणींसह विवाहित महिलांनाही प्रेमात फसवण्याचा प्रयत्न केला जात आहे. याविषयीचा एक अनुभव पुढे दिला आहे.

५ आ १. हिंदु तरुणींपेक्षा विवाहित स्त्रियांकडून आर्थिक लाभ अधिक होत असल्याने त्यांना लक्ष्य करणे : 'महाराष्ट्राच्या अहमदनगर जिल्ह्यातील एका विवाहित स्त्रीचा एक मुसलमान तरुण काही दिवसांपासून प्रतिदिन पाठलाग करत होता. एके दिवशी त्या तरुणाने धीटपणे तिचा हात पकडून बलपूर्वक तिला दुचाकीवर बसवण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी त्या स्त्रीने त्याच्या थोबाडीत मारून स्वतःची सुटका करवून घेतली. त्या स्त्रीने कुटुंबियांना घडलेला प्रसंग सांगितल्यावर त्यांनी त्या मुलाला शोधून काढले. या वेळी त्याने सांगितले, "विवाहित स्त्रियांना प्रेमात ओढणे, हा आमचा नवीन व्यवसाय आहे. आजकाल आम्ही लहान, शालेय अथवा महाविद्यालयीन मुलींना लक्ष्य करणे न्यून (कमी) केले आहे; कारण त्यांच्या पालकांना आमच्याविषयी समजल्यावर एकतर त्यांचे शिक्षण बंद करतात अथवा त्यांचे लग्न लावून देतात. अशा मुलींकडून आमची केवळ शारीरिक भूक भागते; परंतु आर्थिक लाभ होत नाही. एखाद्या विवाहित स्त्रीला आम्ही पटवू शकलो; तर ती आमच्यासाठी '२४ घंटे पैसे पुरवणारे यंत्र' (ए.टी.एम्. मशीन) किंवा ती आमची स्थायी ठेव (फिक्स्ड डिपॉझिट) असते. तिच्याकडून आम्हाला हवे तेव्हा रोख पैसे मिळवता येतात. अशा स्त्रीचा आम्ही ४-५ जण मिळून उपभोग घेतो. आम्ही तिची बहीण, नणंद, मैत्रिणी आदींचीही तिला ओळख करून द्यायला सांगतो. जर तिने आम्हाला विरोध केला, तर आम्ही तिला - तिची अश्लील छायाचित्रे तिच्या नवऱ्याला दाखवण्याची - धमकी देतो. तिला तिचा संसार वाचवायचा असल्याने आम्ही जे सांगू किंवा मागू, ते ती द्यायला सिद्ध होते." - एक जागरूक महिला, मुंबई

५ आ २. विवाहित असलेल्या हिंदु स्त्रीचा मुसलमान महिलेच्या माध्यमातून बुद्धीभेद करणे आणि नंतर तिला मुसलमान मुलाने पळवून नेणे : 'पल्लकड, केरळ येथील प्रेमविवाह केलेल्या एका हिंदु दांपत्याला एक लहान मूल होते. पती-पत्नीचे एकमेकांवर ते महाविद्यालयात असल्यापासून प्रेम होते. विवाहानंतर नोकरीच्या निमित्ताने पत्नीला तिच्या लहान मुलासह दुसऱ्या नगरात स्थलांतरित व्हावे लागले. एक दिवस तिचा पती तिला भेटण्यासाठी नव्या ठिकाणी आला, तेव्हा त्याला त्याची पत्नी इस्लामप्रमाणे आचरण करत असल्याचे आढळले. तिचे पूर्णतः इस्लाम धर्मीय महिलेत रूपांतर झाले होते. हे पाहून त्याला धक्काच बसला. त्याने पत्नीला पुन्हा घरी नेले आणि महिनाभर तेथेच ठेवले. काही दिवसांत त्यांचा संसार नेहमीप्रमाणे चालू झाला. काही दिवसांनी ती त्या कामावर पुन्हा रुजू झाली, तेव्हा एका मुसलमान तरुणाच्या प्रेमात पडली आणि पती अन् मूल यांना मागे ठेवून त्यासह पळून गेली.' - डॉ. मल्लिका आणि श्रीमती संगीता शर्मा, 'मनःशक्ती समुपदेशन केंद्र', केरळ (१३)

५ इ. हिंदु तरुण : 'मुसलमान तरुणीही हिंदु तरुणांना धर्मांतरित करण्यासाठी त्यांच्याशी फसवे प्रेम रचत आहेत. प्रेमात अडकलेल्या तरुणाला विवाहानंतर इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी या तरुणी आग्रह धरतात. 'कोल्हापूर येथे एका मुसलमान तरुणीने हिंदु तरुणाशी विवाह केला. हिंदु धर्मानुसार धार्मिक विधी झाल्यानंतर ती तरुणी तिच्या घरी गेली; मात्र हिंदु तरुणाने धर्मांतर केल्याविना त्याच्याकडे परत येण्यास तिने नकार दिला. तिच्या कथित प्रेमापोटी त्या तरुणाने धर्मांतर केले.' (१४)

५ ई. ख्रिस्ती तरुणी : 'ख्रिस्ती तरुणींनाही मुसलमानांकडून लक्ष्य केले जात आहे. हिंदु मुलींप्रमाणेच ख्रिस्ती तरुणींना प्रेमजालात ओढण्यासाठी 'रोमन कॅथोलिक' तरुणीसाठी ४ लक्ष रुपये, तर 'प्रोटेस्टंट' तरुणीसाठी ३ लक्ष रुपये प्रत्येकी बक्षीस म्हणून देण्याची घोषणा 'मुस्लीम युथ फोरम' या संघटनेने केली आहे.' (१५)

५ ई १. 'केरळ आर्चबिशप परिषदे'ने 'लव्ह जिहाद'विषयी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध करणे : 'केरळ आर्चबिशप परिषदे'ने 'लव्ह जिहाद'चा प्रकार गंभीरतेने घेतला आहे. या परिषदेने जिहादींच्या प्रेमजाळात न अडकण्यासाठी काय करावे, याविषयी मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या आहेत.' (१६)

Scanned by CamScanner

६. 'लव्ह जिहाद'मागील प्रेरणा आणि कट

६ अ. धार्मिक : 'लव्ह जिहाद'मागील कारस्थान मूलतः धार्मिकच आहे. जिहादचा संघर्ष कोणत्याही प्रकारचा अगदी लेखणीचा, वाणीचा, प्रेमाचा किंवा आतंकवादी आक्रमणांचा असू शकतो. जोपर्यंत आपण मुसलमानांच्या धार्मिक शिकवणीचे मूळ लक्षात घेत नाही, तोपर्यंत १,३०० वर्षांपासून तलवार, बंदूक, प्रेम आदी माध्यमांतून चालू असलेली हिंदूंची धर्मांतरे थांबणार नाहीत.

६ अ १. इस्लामची कार्यपद्धत : 'काफिरांना मुसलमान बनवणे आणि संपूर्ण जग इस्लाममय करणे', या ध्येयपूर्तीच्या मार्गांमध्ये पवित्र किंवा अपवित्र, असा भेद मुसलमानांसाठी नसतो; कारण इस्लाममध्ये कार्यपद्धत महत्त्वाची नाही, तर अंतिम परिणाम महत्त्वाचा मानतात. सामर्थ्य अल्प असतांना पळून जाणे, समसमान सामर्थ्य असतांना 'करार' म्हणजे गोड बोलून रहाणे आणि सत्तासामर्थ्य प्राप्त झाल्यावर बलप्रयोग करणे, अशा इस्लाम विस्ताराच्या तीन अवस्था आहेत. म्हणजेच, 'लव्ह जिहाद' हा काही आधुनिक काळातला नवा प्रवाह नाही, तर तो परंपरागत चालत आलेला 'धर्मांतरा'चा जिहादच आहे. हिंदुस्थानात मुसलमान अल्पसंख्य असल्याने त्यांच्यात सत्तासामर्थ्य नाही; म्हणून येथे प्रेमाचा मार्ग निवडण्यात आला आहे.' (१७)

६ अ २. धर्मांध मौलवींची शिकवण

६ अ २ अ. 'काही मौलवी मुसलमान तरुणांना "हिंदु तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांच्यापासून मुलांना जन्म दिल्यास तुम्हाला स्वर्ग मिळेल. त्यामुळे इस्लामचा विस्तार होणार असल्याने अल्लाची कृपादृष्टी तुमच्यावर राहील", असे सांगून त्यांचा बुद्धीभेद करतात, असे निरीक्षण उत्तरप्रदेशमधील गुप्तचर अधिकाऱ्यांनी नोंदवले आहे.' - ममता त्रिपाठी, स्तंभलेखक (१८)

६ अ २ आ. 'लव्ह जिहाद'विषयी प्रबोधन करत असतांना एका हिंदुत्ववाद्याला मुसलमान युवती म्हणाली, "मुसलमान मुलाने हिंदु मुलीशी विवाह केल्यास त्याला स्वर्गप्राप्ती होते आणि मुसलमान मुलीने हिंदु मुलाशी विवाह केल्यास ती नरकात जाते', असे आम्हाला शिकवले आहे." - श्री. वैभव आफळे, धनबाद, झारखंड.

६ आ. आंतरराष्ट्रीय : 'लव्ह जिहाद' हा हिंदुस्थानातील हिंदु तरुणींना धर्मांतरित करण्याचा शत्रूराष्ट्रांनी रचलेला आंतरराष्ट्रीय कट आहे.

Scanned by CamScanner

६ आ १. 'लव्ह जिहाद'साठी अरब राष्ट्रांतून पैशांचा पुरवठा ! : 'केरळमधील वृत्तपत्रांच्या मते 'लव्ह जिहाद'साठी अरब राष्ट्रांतून पैसा पाठवला जातो. दमाम (सौदी अरेबिया) येथे असलेली 'इंडियन फ्रॅटर्निटी फोरम' ही संस्था याच कारणासाठी पैसा गोळा करते.' (१९)

'लव्ह जिहाद'साठी सौदी अरेबिया येथून 'वेस्टर्न युनिअन मनी ट्रान्सफर'च्या माध्यमातून हवालाद्वारे पैसा येतो. भारतातील काही दागिन्यांच्या व्यावसायिकांच्या आखाती राष्ट्रांमध्ये शाखा आहेत. त्यांच्याद्वारेही पैशांचे स्थलांतर केले जाते. हज यात्रेसाठी जाणाऱ्या मुसलमान यात्रेकरूंच्या माध्यमातूनही पैशांचे स्थलांतर होते; कारण हज येथून येणाऱ्या विमानांतील प्रवाशांची कडक पडताळणी होत नाही.' (२०)

६ आ २. 'लव्ह जिहाद' हे 'लष्कर-ए-तोयबा'चे हिंदुस्थानच्या विरोधातील छुपे युद्धच ! : 'पाकिस्तानमधील 'लष्कर-ए-तोयबा' या आतंकवादी संघटनेने १९९६ पासून 'लव्ह जिहाद'च्या माध्यमातून हिंदुस्थानात कार्य करण्यास प्रारंभ केला. 'लष्कर-ए-तोयबा'कडून 'लव्ह जिहाद'साठी मुसलमान तरुणांना मोठ्या प्रमाणावर पैसा, अत्याधुनिक साधनसुविधा आणि नियोजनबद्ध आराखडे पुरवले जात आहेत.' (२१)

७. हिंदु तरुणींभोवती प्रेमपाश आवळण्याच्या योजनाबद्ध कार्यपद्धती

७ अ. शाळा-महाविद्यालयांसमोर दुचाकीवरून फिरणे : 'ही शाळा-महाविद्यालयांतील हिंदु तरुणींना प्रेमात ओढण्यासाठी नेहमी वापरली जाणारी पद्धत आहे. मुसलमान तरुण 'रोड रोमियों'प्रमाणे (रस्त्यावरील लंपट तरुणांप्रमाणे); पण उच्च राहणीमान ठेवून शाळा आणि महाविद्यालये यांच्या भोवती दुचाकीवरून फेऱ्या मारतात.' - ममता त्रिपाठी, स्तंभलेखक (२२)

७ अ १. 'जहांगीर रझाक या केरळमधील कोझ्झीकोड विधी (लॉ) महाविद्यालयाच्या विद्यार्थ्याने वरील पद्धत वापरून ४२ मुलींची फसवणूक केली.' (२३)

७ आ. भ्रमणभाषच्या (मोबाईल फोनच्या) साहाय्याने संपर्क करणे : 'हिंदु तरुणींशी प्रेमसंवाद साधण्यासाठी मोठ्या प्रमाणात भ्रमणभाषचा वापर केला जातो.

Scanned by CamScanner

'हिंदु मुलींशी भ्रमणभाषवर कसे लाघवी बोलावे', याचे प्रशिक्षण मुसलमान मुलांना दिले जाते. या पद्धतीचा वापर प्रामुख्याने शाळा आणि महाविद्यालय येथे जाणाऱ्या मुली, कामावर जाणाऱ्या महिला आणि 'माहिती अन् तंत्रज्ञान (आय टी)' शाखेच्या विद्यार्थिनी यांसाठी केला जातो.

७ आ १. भ्रमणभाषची 'रिचार्ज' सेवा पुरवणाऱ्या दुकानांमधून हिंदु मुलींचे भ्रमणभाष क्रमांक मुसलमान तरुणांना दिले जाणे : केरळमधील 'जन्मभूमी' या मल्याळी वृत्तपत्राने दिलेल्या माहितीनुसार, मलाप्पुरम-एडप्पल आणि कोझ्झीकोड-पलायम या मुसलमानबहुल भागांतील भ्रमणभाषची 'रिचार्ज' सेवा पुरवणाऱ्या दुकानांमधून तरुण मुलींचे भ्रमणभाष क्रमांक घेऊन ते मुसलमान तरुणांना दिले जातात.

७ आ २. भ्रमणभाषच्या (मोबाईलच्या) साहाय्याने हिंदु तरुणींना प्रेम-पाशात अडकवण्याची पद्धत : हिंदु मुलीचा भ्रमणभाष क्रमांक मिळाल्यानंतर मुसलमान तरुण त्या मुलीच्या भ्रमणभाषवर लघुसंदेश (एसएमएस) पाठवण्यास, तसेच तिला रात्री भ्रमणभाषवरून संपर्क करण्यास प्रारंभ करतो. प्रारंभी संबंधित मुलगी विरोध करते; परंतु तो गोड गोड बोलून तिची पाठ सोडत नाही. काही काळाने ती मुलगी त्याचा भ्रमणभाष येण्याची आतुरतेने वाट पहायला लागते. अशा वेळी तो 'लव्ह जिहादी' काहीशा अश्लील भाषेत बोलतो, मग ती मुलगी त्याच्या जाळ्यात ओढली जाते.' (२४)

७ आ ३. विद्यार्थींनींना भ्रमणभाष (मोबाईल) भेट देऊन त्यांना प्रेमपाशात अडकवणे : 'भ्रमणभाष विकत घेण्याची क्षमता नसलेल्या विद्यार्थींनींना मुसलमान तरुण भ्रमणभाष भेट म्हणून देतात. 'लव्ह जिहाद' प्रकरणी आत्महत्या केलेल्या काही मुलींच्या घरी मी स्वतः भेट दिल्यानंतर त्या सर्व प्रकरणांत त्यांना त्यांच्या प्रियकरांकडून भ्रमणभाष भेट मिळाला असल्याची समान गोष्ट मला आढळली. केरळमधील अनेक प्रकरणांचा मी पत्रकार म्हणून अभ्यास केल्यानंतर भ्रमणभाष हेच 'लव्ह जिहाद'चे सर्वांत प्रभावी शस्त्र असल्याच्या निष्कर्षावर मी आले.' - सौ. लीला मेनन, संपादिका, जन्मभूमी (मल्याळम दैनिक). (२५)

७ इ. इंटरनेट : हिंदु मुलींशी जवळीक साधण्यासाठी आंतरजालचा (इंटरनेटचा) मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. 'फेसबुक' आणि 'ऑर्कुट' या संकेतस्थळांच्या

Scanned by CamScanner

माध्यमातून हिंदु तरुणींशी मैत्री करणे आणि त्याद्वारे गाठीभेटी वाढवून आपला हेतू साध्य करणे, असे हे षड्यंत्र असते. अलीकडे 'शादी डॉट कॉम' या संकेतस्थळाच्या माध्यमातूनही विवाहेच्छुक हिंदु तरुणींना फसवले जात आहे. याविषयीचा एक अनुभव पुढे दिला आहे.

७ इ १. 'शादी डॉट कॉम' संकेतस्थळाच्या माध्यमातून प्रेमजालात फसलेली एक विवाहेच्छुक हिंदु तरुणी : 'शादी डॉट कॉम' या विवाह जुळवणाऱ्या संकेतस्थळावर डॉ. नम्रता कदम या तरुणीने सुयोग्य वर मिळण्यासाठी नावनोंदणी केली होती. शकील नावाच्या एका मुसलमानाने डॉ. नम्रता कदम हिला तो तिच्याशी विवाह करण्यास इच्छुक असल्याचे संगणकीय पत्र पाठवले; मात्र तिने त्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर शकीलने तिला परत पत्र पाठवले. त्यानंतर डॉ. नम्रता हिने शकीलशी संपर्क केला. पुढे त्यांच्या भेटीगाठी वाढल्या आणि अल्पावधीतच ते दोघे विवाहबद्ध झाले.' - श्री. रमण (२६)

७ ई. हिंदु तरुणींना फूस लावण्यासाठी मुसलमान तरुणींचे साहाय्य घेणे : 'लव्ह जिहाद'च्या यशस्वीतेत मुसलमान तरुणींचेही साहाय्य घेतले जाते. या मुसलमान मुली हिंदु मैत्रिणींची ओळख मुसलमान तरुणांशी करून देण्याचे काम करतात.' (२७)

७ उ. हिंदु पद्धतीने वागणे : 'हिंदु मुलींसमोर 'आपण हिंदु आहोत', असे भासवण्यासाठी मुसलमान तरुण स्वतःच्या मनगटाला गंडे-दोरे बांधतात. तसेच स्वतःची नावेही हिंदु मुलांच्या नावांशी मिळती-जुळती सांगतात.' - ममता त्रिपाठी, स्तंभलेखक (२८)

७ ऊ. हिंदूंच्या घरी काम करणे : 'हिंदूंच्या घरातील महिलांना प्रेमात ओढण्यासाठी मुसलमान तरुण त्यांच्या घरी काम स्वीकारतात. जयपूर (राजस्थान) येथे या क्लृप्तीद्वारे शेकडो हिंदु महिलांना बाटवण्यात आले आहे.' (२९)

७ ए. बनावट प्रसंग घडवून त्यात हिंदु तरुणीच्या साहाय्यासाठी धावून येणे : हिंदु मुलीला प्रेमात ओढण्याच्या कटाचा एक भाग म्हणून काही मुसलमान मुले तिच्याशी अंगलटपणा करतात; मग एक मुसलमान मुलगा सज्जन असल्याचे भासवून तिच्या साहाय्यासाठी येऊन तिला सोडवतो. हळूहळू मग तो तिच्याशी

Scanned by CamScanner

चहा-कॉफीच्या माध्यमातून जवळीक साधून त्याचा हेतू साध्य करतो. अशा प्रकारे जवळजवळ ३०० हिंदु मुली अहमदनगर (महाराष्ट्र) येथे प्रेमजालात अडकल्या आणि धर्मांतरित झाल्या. (वर्ष २०१०)

७ ऐ. 'व्हॅलेंटाईन डे'सारख्या पाश्चात्त्य दिवसांचे निमित्त साधणे : घरात अनिर्बंध स्वातंत्र्य असलेल्या हिंदु मुली 'व्हॅलेंटाईन डे', 'फ्रेंडशीप डे', 'रोझ डे' आदी पाश्चात्त्यांचे दिवस त्यांच्या मित्रांसह व्यतीत करतात. अशा तरुणींशी मुसलमान तरुण मैत्री करतात आणि 'व्हॅलेंटाईन डे'सारख्या पाश्चात्त्य दिवसांची संधी साधून त्यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढून फसवतात.

७ ओ. नवरात्रोत्सवात हिंदु मुलींसह गरबा नृत्यात सहभागी होणे : 'अनेक ठिकाणी देवीच्या नवरात्रोत्सवात गरबा नृत्य (दांडिया रास) खेळण्याच्या निमित्ताने मुसलमान मुले हिंदु मुलींना जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करतात. बेळगाव येथे असे प्रकार घडले आहेत.' – श्री. शिवाजी गौंडाडकर, संपादक, 'साप्ताहिक राष्ट्रपर्व', बेळगाव.

७ औ. संमोहित करणे : 'काही वेळा मुलींना प्रेमपाशात फसवण्यासाठी मुसलमान तरुण संमोहनविद्येचा वापर करतात. संमोहित झालेल्या मुली पालकांचे ऐकत नाही वा त्यांच्या भावनांना प्रतिसाद देत नाहीत.

७ अं. मुलींचा बुद्धीभेद करण्यासाठी विशिष्ट औषधांचा वापर करणे : काही वेळा प्रेमसंबंध वाढवण्यासाठी मुसलमान तरुण मुलींना मुसलमानांच्या मालकी असलेल्या नियोजित 'आयस्क्रीम पार्लर', 'ज्यूस सेंटर' आदी ठिकाणी नेतात. त्या ठिकाणी मुलींना देण्यात येणाऱ्या पेयांत विशिष्ट औषधे मिसळली जातात. ही औषधे व्यक्तीच्या बुद्धीवर नियंत्रण मिळवण्यासाठी असतात.' – प्रा. उन्नीकृष्णन (औषधतज्ञ) [३०]

७ क. 'वशीकरण' किंवा 'करणी' करणे : 'पैगाम इस्लाम' संघटनेने 'मुसलमान तरुणांनी हिंदु मुलींशी मैत्री करून त्यांना जाळ्यात ओढण्यासाठी प्रसंगी वशीकरणाचा उपयोग करावा', असा 'फतवा' काढला आहे.' [३१]

(टीप : 'मंत्र, यंत्र, भस्म आणि विविध प्रकारची औषधी द्रव्ये यांच्या साहाय्याने एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीला वश किंवा मोहित करू शकणे आणि

Scanned by CamScanner

तिच्यावर हवा तसा प्रभाव पाडू शकणे', या तांत्रिक विद्येला 'वशीकरण' म्हणतात. तसेच एखाद्या व्यक्तीला उद्देशून केलेले चेटूक, जारण-मारण, मंत्र-तंत्र इत्यादी दुष्ट प्रयोगांना 'करणी' म्हणतात.)

७ क १. करणीद्वारे 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेली मुलगी घरी परत आणूनही तिने मुसलमान चालीरीतींप्रमाणे वागणे आणि आध्यात्मिक उपाय केल्यानंतर ती भानावर येणे : 'मुंबईत रहाणाऱ्या गर्भश्रीमंत राजस्थानी हिंदु कुटुंबातील प्रीतीने झोपडपट्टीत रहाणाऱ्या अब्दुल शेख या मुसलमानासह पळून जाऊन विवाह केला. पोलिसांनी तिला शोधून काढून सुधारगृहात आणले. ती १८ वर्षांची म्हणजे कायद्याच्या दृष्टीने 'सज्ञान' असल्याने तिला जास्त दिवस सुधारगृहात ठेवणे पोलिसांना अडचणीचे होते. त्यामुळे तिचे कुटुंबीय मोठ्या अपेक्षेने माझ्याकडे आले. अब्दुलचे इत्थंभूत विवरण गोळा केल्यानंतर तो पदपथावरच कष्ट (हमाली) करून पोट भरत असल्याचे समजले. प्रीतीला प्रेमाच्या जाळ्यात ओढण्यामुळे अब्दुलला ५०,००० रुपये मिळाले होते, हेही आम्हाला कळले. त्यानंतर प्रीतीच्या कुटुंबियांना घेऊन आम्ही एक योजना आखली. त्यानुसार सुधारगृहातून सुटल्यावर लगोलग आम्ही प्रीतीला चारचाकी वाहनात कोंबून एका अज्ञातस्थळी हलवले. तेथे कुटुंबियांच्या जवळ येऊनही प्रीतीच्या मुखावर कोणताही अपराधीपणाचा भाव जाणवत नव्हता. स्वतःला ती 'अब्दुलची बिवी, आयेशा' म्हणवत होती. योजनेनुसार 'अब्दुल जर हिंदु झाला, तर आम्हीच तुमचा विवाह लावू', असे कुटुंबियांनी सांगितल्यावर प्रीतीने भ्रमणभाषवर अब्दुलला हिंदु होण्यासंदर्भात विचारले; परंतु त्याने तिलाच करड्या स्वरात रागावून 'तलाक' देण्याची धमकी दिली. असा अपमान होऊनही प्रीती तिच्या आई-वडिलांवरच उर्दूमध्ये ओरडली, "मुझे मेरे शौहरके पास जाना है । वो जिस हाल में मुझे रखेगा, उसमें मैं रहुंगी ।" शुद्ध हिंदी बोलणारी सुशिक्षित प्रीती एखाद्या परंपरागत मुस्लीम मुलीसारखे बोलत होती. तिने कपडेही इस्लामी पद्धतीप्रमाणे घातले होते. तिच्यात अचानक आलेला हा 'इस्लामीपणा' पाहून मी एका प्रसिद्ध भविष्यवेत्त्याची भेट घेतली. त्यांनी ग्रहांचा अभ्यास करून प्रीतीवर 'करणी' झाल्याचे सांगितले. दुसऱ्याच दिवशी त्यांनी त्यांच्या शिष्यांसह प्रीतीच्या घरी जाऊन दोन घंटे (तास) मंत्रपठण केले. तसेच तिच्यावरून लिंबे आणि विभूती यांच्या साहाय्याने उतारा काढला. त्या रात्री पहिल्यांदाच प्रीती शांत झोपली. दुसऱ्या

Scanned by CamScanner

दिवशी तिने उठून वडिलांच्या पाया पडून क्षमा मागितली. आता ती आपल्या मैत्रिणींनाही 'लव्ह जिहाद'पासून सावध रहाण्यास सांगते.' – श्रीमती अरुणाताई आचार्य, 'नारी रक्षामंच' विभाग (चेंबुर, मुंबई), विश्व हिंदु परिषद. (३२)

७ क २. 'लव्ह जिहाद'च्या विळख्यात सापडलेल्या मुलीने समुपदेशनाला साहाय्य न देणे, हा वशीकरणाचा प्रभाव ! : कोट्टायम (केरळ) येथील मंजूमल या तरुण परिचारिकेला (नर्सला) मुसलमान तरुणाने भ्रमणभाषवर गोड-गोड बोलून प्रेमात पाडले आणि नंतर ते एकमेकांसह फिरू लागले. मंजूमलच्या घरच्यांनी तिला याविषयी विरोध केल्यानंतर, तसेच त्या तरुणाला तिच्यासमोरच 'हिच्याशी संबंध ठेवू नकोस', असे स्पष्टपणे सांगितल्यानंतरही ती 'त्याच्याशीच विवाह करायचा', असे म्हणू लागली. त्या तरुणाची चौकशी करण्याचा प्रयत्न केल्यानंतर त्या नावाची व्यक्तीच अस्तित्वात नसल्याचे दिसून आले. तसेच त्याचा पत्ताही संदर्भहीन होता. दोन मास (महिने) मंजूमलला घराबाहेर न पाठवणे, तिचा प्रियकर बनावट असल्याचे सांगणे आणि 'लव्ह जिहाद'च्या धोक्याच्या परिणामांविषयी समुपदेशन (काउन्सेलिंग) करणे, या प्रक्रिया राबवूनही ती घरच्यांचे ऐकण्यास सिद्ध नाही. अनेक मास (महिने) होऊनही 'आपला मित्र खरा असून त्याच्याशीच मी विवाह करणार', असा हट्टाग्रह तिने चालूच ठेवला आहे. तिच्यावर वशीकरण झाल्याची शक्यता आहे.' – डॉ. मल्लिका आणि श्रीमती संगीता शर्मा, 'मनःशक्ती समुपदेशन केंद्र', केरळ. (३३)

७ क ३. वशीकरण किंवा करणी यांचा प्रभाव नष्ट करण्यासाठी करावयाचे काही आध्यात्मिक उपाय

अ. 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या मुलीच्या डोक्यावर हात ठेवून कुलदेवतेचा नामजप सतत करावा.

आ. लिंबू आणि सात्त्विक उदबत्तीची विभूती यांच्या साहाय्याने उतारा काढावा.

इ. गाणगापूरसारख्या जागृत तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी किंवा संतांच्या आश्रमात काही काळासाठी मुलीसह वास्तव्य करावे.

७ ख. अपहरण : 'हिंदु तरुणींना लक्ष्य करण्यासाठी केवळ प्रेमास्त्रांचाच नाही, तर वेळप्रसंगी बळाचाही वापर केला जातो. दिल्ली आणि हैद्राबाद या दोन महानगरांतून

Scanned by CamScanner

प्रतिवर्षी अनुमाने १५ सहस्र हिंदु तरुणी मुसलमानांकडून पळवल्या जातात. यावरून संपूर्ण देशातील अधिकृत संख्या किती असेल, याचे अनुमान काढता येईल.' (३४)

८. 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या हिंदु स्त्रियांची होणारी परवड

८ अ. इस्लामी धर्मांतर केंद्रात केले जाणारे अत्याचार : 'हिंदु मुलगी प्रेमात अडकल्यानंतर मुसलमान तरुण तिला 'इस्लाम धर्म स्वीकारल्यासच विवाह करीन', असे धमकावतात. त्यानंतर तिला इस्लामी धर्मांतर करण्याच्या केंद्रात नेले जाते. तेथे धर्मांतरित होण्यास मुलीने नकार दिल्यास तिच्यावर अत्याचार केले जातात.' (३५)

८ आ. मोलकरीण म्हणून वापर : मुसलमानाशी 'निकाह' केल्यावर एक हिंदु मुलगी त्याच्या घरी गेल्यावर त्याला आधीच दोन बायका असल्याचे तिच्या लक्षात आले. त्या वेळी तो मुसलमान तिला म्हणाला, "तुला तुझ्या आई-वडिलांनी घरातून बाहेर काढले आहे. तुला येथे रहायचे असेल, तर मोलकरीण म्हणून रहावे लागेल."

८ इ. अश्लील ध्वनीचित्र-चकती (डीव्हीडी) किंवा लघुचित्रसंदेश (एम्.एम्.एस्.) बनवण्यासाठी वापर : 'अश्लील ध्वनीचित्र-चकतींना प्रचंड मागणी असल्याने 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या तरुणींचा वापर त्या बनवण्यासाठी केला जातो.

इचलकरंजी (जिल्हा कोल्हापूर) येथे एका मुसलमानाने विवाहित हिंदु तरुणीला प्रेमाच्या जाळ्यात फसवून तिचे भ्रमणभाषवर नग्न चित्रीकरण केले. त्याचा लघुचित्रसंदेश बनवून तो सर्वत्र प्रसारित केला. त्यात ती स्त्री हिंदु असल्याचे दाखवण्यासाठी त्याने हे चित्रीकरण तिच्या कुंकवापासून केले होते.' (३६)

८ ई. वेश्याव्यवसायासाठी वापर : 'केरळ पोलिसांनी मध्यंतरी कोची आणि कोझ्झीकोड येथील 'रेड लाईट' विभागामध्ये छापे घालून काही मुसलमान मुलींना पडकले असता, त्यांपैकी बहुतांश मुली या मूळच्या मंगळुरू आणि बेंगळुरू येथील हिंदु अथवा ख्रिस्ती होत्या. त्यांचे बळाने धर्मांतर केले गेले होते.' (३७)

८ उ. इस्लामी राष्ट्रांत विक्री

१. 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या मुलींना कोची आणि कोझी येथील मनुष्यविरहित भागांतून जहाजाद्वारे प्रथम मंगळुरू, गोवा, चेन्नई किंवा लक्षद्वीप येथे

Scanned by CamScanner

पाठवले जाते. तेथून 'विदेशात काम देऊ', असे आश्वासन देऊन त्यांना अरब देशांत पाठवले जाते. तेथे गेल्यावर या मुलींना 'वेश्या' म्हणून अरबांना विकले जाते.' (३८)

२. 'केरळमधील काही तरुणींना बांगलादेशातही नेऊन विकण्यात आले. यातील काही तरुणींना तेथे घरकामासाठी ठेवण्यात आले, तर काही तरुणींचा अवैध धंद्यांसाठी वापर करण्यात आला.' (३९)

८ ऊ. जिहादी कारवायांसाठी वापर : 'केंद्रीय अन्वेषण विभागाच्या ('सीबीआय'च्या) अहवालानुसार, देशभरातून 'लव्ह जिहाद'द्वारे धर्मांतरित झालेल्या अनुमाने ४,००० मुलींना पाकिस्तानमधील आतंकवादी संघटना जिहादी कारवायांचे प्रशिक्षण देत आहेत.' (४०)

८ ए. फसवणूक झाल्याच्या भावनेतून आत्महत्या

८ ए १. केरळमधील ३ महाविद्यालयीन मुलींनी आत्महत्या करणे : 'अंबलप्पुझा येथे 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या अनिता, वेणी आणि जुलिया या तीन मुलींनी त्यांच्या वर्गातील सौफर अन् शहनाझ या 'नॅशनल डेव्हलपमेंट फ्रंट' संघटनेच्या सदस्यांकडून होत असलेल्या शारीरिक शोषणाला कंटाळून आत्महत्या केली.

८ ए २. बळाने धर्मांतर केल्याने कंटाळून आत्महत्या करणारी प्रतिभा प्रभाकरन ! : फेब्रुवारी २००५ मध्ये केरळमधील प्रतिभा प्रभाकरन फिरोझसमवेत पळून गेली. प्रतिभाच्या कुटुंबियांनी पोलिसांत धाव घेतल्यावर ते दोघे न्यायालयासमोर उपस्थित राहिले. फिरोझने न्यायालयात सांगितले, 'मी प्रतिभावर खरोखरच प्रेम करतो आणि तिला धर्मांतरासाठी आग्रह करणार नाही.' त्यानंतर त्याने प्रतिभाला तिच्या कुटुंबियांशी संपर्क करू दिला नाही. लग्न झाल्यावर १-२ वर्षांनी फिरोझ आणि त्याचे कुटुंबीय इस्लाम धर्म स्वीकारण्यासाठी प्रतिभावर दबाव आणू लागले. तिला पुन्हानी येथील इस्लामी धर्मांतर केंद्रात नेण्यात आले; परंतु तिथे तिने धर्मांतरित होण्यास कडाडून विरोध केला. त्यानंतर घरीच मौलवीला आणून तिचे धर्मांतर करण्यात आले. तिच्यावर बुरखा घालणे आणि नमाज पढणे यांसाठी बळाचा वापर करण्यात आला. या सर्वाला कंटाळून शेवटी तिने आत्महत्या केली.

८ ऐ. 'लव्ह जिहाद'मुळे महिलांच्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली होणे : 'लव्ह जिहाद'ची समस्या धर्मांतराच्या प्रश्नापुरती मर्यादित नाही. त्यामुळे

Scanned by CamScanner

महिलांच्या मूलभूत अधिकारांची पायमल्ली होत आहे. 'निरागस प्रेमिका' म्हणून जीवनाचा होणारा आरंभ होणाऱ्या स्त्रीचा 'वाऱ्यावर सोडलेली परित्यक्ता स्त्री' म्हणून शेवट होतो.' - डॉ. श्रीरंग गोडबोले, पुणे (४१)

९. 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या काही मुलींच्या दुर्दैवी कहाण्या

९ अ. 'लव्ह जिहाद'ला बळी पडल्याने घरच्यांनाही तोंड दाखवू न शकणारी मंजू ! : एका मुसलमान युवकाने मंजूला प्रेमाच्या जाळ्यात फसवले आणि विवाह करण्यासाठी तिला धर्मांतरित होण्यास सांगितले. तिने धर्मांतर केल्यावर त्याने तिला सोडून दिले. मंजू म्हणते, "तो मला एका बस स्थानकावर भेटला. तो प्रतिदिन माझा पाठलाग करायचा. त्यानंतर त्याने कुठून तरी माझा भ्रमणभाष क्रमांक मिळवला. तो प्रतिदिन मला संपर्क करू लागला. मला वाटले, 'त्याचे माझ्यावर प्रेम आहे'; परंतु ती माझी चूक होती. आता मी माझ्या घरच्यांना तोंड दाखवू शकत नाही. काही वेळा 'आत्महत्या करावी', असा विचार येतो." (४२)

९ आ. 'लव्ह जिहाद'ची दाहकता सांगणारे एका उच्च विद्याविभूषित तरुणीचे आत्मकथन ! : 'मी मानसशास्त्र विषयात पदव्युत्तर (एम्.ए.) शिक्षण घेतल्यानंतर एका खाजगी आस्थापनात कामास होते. तेथे काम करणारा एक मुसलमान तरुण मला प्रेमाच्या जाळ्यात ओढण्याचा प्रयत्न करत होता. आई-वडिलांनी केलेल्या सुसंस्कारांमुळे माझ्या पालकांसह माझाही परधर्मीय तरुणाशी विवाह करण्यास विरोधच होता. त्या मुसलमानाने एक दिवस मला त्याच्या घरी बोलवले. तेथून निघतांना माझा हातरुमाल त्याच्या घरीच राहिला. काही दिवसांनी माझ्या घरी आलेल्या एका ज्योतिषाने 'त्या रुमालावर मुसलमानाने जादूटोणा केला आहे', असे सांगितले. एकदा दिल्ली आणि आंध्रप्रदेश येथे जाऊन मुंबईत परतल्यानंतर त्याने मला एक सुवर्णहार आणि पदक भेट म्हणून दिले. मलाही ते घेण्याची दुर्बुद्धी झाली. त्याने माझ्यासमोर लग्नाचा प्रस्ताव ठेवला. मी लगेचच त्याचे सुवर्णालंकार परत देऊन लग्नास नकार दिला. एके दिवशी त्याने मला आग्रहाने एका टॅक्सीत बसवले आणि एका ठिकाणी नेले. तेथे त्याने दाढी करण्याच्या

Scanned by CamScanner

पात्याने (ब्लेड) मनगटाची शीर कापून त्याने पुन्हा लग्नाची मागणी घातली. रक्त पाहून मला भीती वाटली आणि मी रडू लागले. त्याने 'तुझे माझ्यावर प्रेम असल्यानेच रडू आले', असा अर्थ मला सांगितला. तो सतत एक महिना माझ्या मागावर राहून भावनिक शब्दच्छलातून प्रेमाची विनवणी करत होता. एके दिवशी त्याने मला पळवून नेले आणि बळाने लग्न केले. माझ्या आईला हे समजल्यानंतर तिला धक्का बसला आणि मेंदूचा विकार (ब्रेन हॅमरेज) होऊन तिचा मृत्यू झाला. तेव्हा मला पुष्कळ वाईट वाटले; मात्र त्याला कोणताच अर्थ नव्हता. लग्नानंतर माझ्यावरील अत्याचारांच्या मालिकेला प्रारंभ झाला. मला एक अपत्य झाले. मी आणि माझा मुलगा यांवर शब्दांतही सांगता येणार नाहीत, असे अत्याचार त्याने केले. त्याने माझ्यावर अर्वाच्य शिव्यांची लाखोली वाहणे नित्याचेच झाले होते. मला मरावेसे वाटत होते; मात्र मी तेही करू शकत नव्हते. त्याने माझ्या आईच्या वर्षश्राद्धालाही मला जाऊ दिले नाही. तसेच मला माझ्या बहिणी आणि अन्य नातेवाईक यांच्याशी संपर्क तोडण्यास भाग पाडले. त्या मुसलमानाचे घर 'छोट्या पाकिस्तान'सारख्या भागात होते, त्यामुळे मला या अत्याचारांसंबंधी कुणाजवळ बोलण्याचीही चोरी होती. सतत ८ वर्षे मी अत्याचार सहन केले. कदाचित त्यातही जादूटोण्याचाच भाग असावा. मधल्या कालावधीत त्याने अन्य महिलांशी शारीरिक संबंध ठेवले, तेव्हा मी त्याच्या विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. त्यामुळे त्याने मला घराबाहेर हाकलले आणि पुढच्याच महिन्यात दुसरे लग्न केले. त्यानंतर 'विश्व हिंदु परिषदे'च्या साहाय्याने मी पुन्हा हिंदु धर्मात प्रवेश केला. माझी समस्त हिंदु तरुणींना एकच विनंती आहे, माझ्यासारखी चूक तुम्ही करू नका !' - 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेली हिंदु तरुणी, मुंबई (४३)

१०. व्याप्ती

१० अ. राज्यस्तरीय

१० अ १. केरळ

१० अ १ अ. 'लव्ह जिहाद'साठी कार्यरत संघटना

१० अ १ अ १. 'लव्ह जिहाद' संघटना : 'पठानामथिट्टा येथे हिंदु तरुणींना प्रेमात फसवून त्यांच्या धर्मांतरासाठी 'लव्ह जिहाद' ही संघटना कार्यरत आहे, असे वृत्त 'केरळ कौमुदी न्यूज डॉट कॉम' या मल्याळी वृत्तपत्राच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध

Scanned by CamScanner

झाले आहे. 'लव्ह जिहाद' संघटनेच्या तत्त्वानुसार 'या संघटनेच्या सदस्याला हिंदु मुलींशी प्रेम प्रस्थापित करण्यासाठी दोन आठवड्यांचा, तर तिचे धर्मांतर करून विवाह करण्यासाठी ६ महिन्यांचा कालावधी निर्धारित केलेला आहे. दोन आठवड्यांत एखादी मुलगी न फसल्यास सदस्याने दुसऱ्या मुलीसाठी प्रयत्न करायचे ठरलेले आहे. हिंदु मुलीला फसवून तिच्याशी विवाह करण्यात मुसलमान तरुण यशस्वी ठरला, तर त्याला स्वतःचा व्यापार करण्यासाठी संघटनेकडून १ लाख रुपये दिले जातात. हे सर्व करण्यासाठी 'लव्ह जिहाद' संघटनेला अरब राष्ट्रांतून पैसा पुरवला जातो. महाविद्यालयात प्रवेश घेणाऱ्या आणि प्रेमपाशात फसू शकणाऱ्या हिंदु मुलींची सूची (यादी) या संघटनेने बनवली आहे.' (४४)

१० अ १ अ २. 'लष्कर-ए-तोयबा'च्या माध्यमातून कार्य : 'कोझ्झीकोड, कोची आणि थिरुवनअनंतपुरम या नगरांत 'लष्कर-ए-तोयबा' या संघटनेकडून प्रशिक्षित अब्दुल शुकुर, अन्वर सादत आणि हजीबुल रहमान या मुसलमानांच्या नेतृत्वाखाली 'लव्ह जिहाद'साठी कार्य केले जाते. मुसलमान तरुणांशी समन्वय साधण्यासाठी त्यांच्या जिल्हा पातळीवर वेगवेगळ्या समित्या आहे. या समित्यांचा एक विभागीय अध्यक्ष असतो. तसेच धर्मांतराविषयीची प्रकरणे हाताळण्यासाठी त्यांची वेगळी 'कायदा सल्लागार समिती' आहे.' (४५)

१० अ १ अ ३. 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया'ची युवक संघटना 'कॅम्पस फ्रंट' : 'केरळ, कर्नाटक आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' नावाची मुसलमान संघटनांची आघाडी सक्रीय आहे. 'कॅम्पस फ्रंट' ही या संघटनेची युवा आघाडीही 'लव्ह जिहाद'साठी कार्यरत आहे. या संघटनेचे सदस्य इंटरनेटचा वापर करून 'होतकरू' हिंदु आणि ख्रिस्ती मुलींची माहिती गोळा करतात. 'कॅम्पस फ्रंट' ही संघटना हिंदु मुलींना फसवण्याविषयीचे वेळापत्रक या जिहाद्यांना आखून देते.' - डॉ. श्रीरंग गोडबोले, पुणे (४६)

१० अ १ अ ४. अन्य मुसलमान संघटना : 'इस्लामिक पॉप्युलर फ्रंट'ची युवक संघटना 'कॅम्पस फ्रंट', 'मुस्लिम युथ फोरम', 'तसरीन मिलीयत', 'इस्लाम असोसिएशन', तसेच अशा आणखी काही संघटना 'लव्ह जिहाद'ला साहाय्य करतात', असे केरळ पोलिसांच्या अन्वेषणामध्ये आढळून आले आहे.

Scanned by CamScanner

१० अ १ अ ५. महिला जिहादी संघटना : 'तसरान वालियत' आणि 'शाहीन फोर्स' या महिला जिहादी संघटना 'लव्ह जिहाद'साठी गुप्तपणे साहाय्य करतात.' (४७)

१० अ १ अ ६. 'हिंदु मुलीला कसे फसवायचे', याचे मुसलमान युवकांना शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देणारी 'इस्लामिक रिसर्च फाऊंडेशन' : 'केरळमध्ये दरिद्री कामगारांपासून उच्चशिक्षित तरुणापर्यंत सर्व प्रकारच्या मुसलमान युवकांना 'हिंदु मुलीला कसे फसवायचे', याचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण देण्यासाठी 'इस्लामिक रिसर्च फाऊंडेशन'चे रीतसर वर्ग (कोर्सेस) आहेत. मुलींना प्रेमपाशात अडकवणे, व्यसन लावणे आणि नंतर त्यांचे प्रतिमाहनन (ब्लॅकमेल) करणे आदी सर्व प्रकारचे प्रशिक्षण देणाऱ्या या वर्गांमध्ये पुढील प्रशिक्षण प्रामुख्याने दिले जाते.

अ. हिंदु धर्माचे पुरेसे ज्ञान

आ. मुलीशी संवाद साधतांना हावभाव कसे असावेत ?

इ. मुलीला स्पर्श कसे करावेत ?

ई. मुलीला 'आपण आधुनिक आणि निरागस आहोत', हे कसे दाखवावे ?

उ. 'मुलीच्या आपण अधीन आहोत', हे कसे व्यक्त करावे ?

ऊ. शारीरिक संबंधांसाठी मुलीचे मन कसे वळवावे ?' – श्री. समीर दरेकर (४८)

१० अ १ आ. 'लव्ह जिहाद'च्या बळी ठरलेल्या केरळमधील मुलींची धक्कादायक आकडेवारी !

१० अ १ आ १. केरळमध्ये प्रतिदिन न्यूनतम ८ मुली संशयास्पदरित्या हरवतात ! : 'केरळमध्ये प्रतिदिन न्यूनतम ८ मुली संशयास्पदरित्या हरवतात. कोची येथील 'नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ ॲडव्हान्स लीगल स्टडीज' या महाविद्यालयाने केरळ पोलिसांच्या गुन्हेनोंदींच्या आकडेवारीच्या आधारे केलेल्या अभ्यासात वर्ष २००७ मध्ये २,१६७ आणि २००८ मध्ये २,५३० मुली हरवल्याचे आढळून आले. यांपैकी ६०० मुलींविषयी अन्वेषण यंत्रणांकडे काहीच विवरण नव्हते. ही संख्या गुन्हेनोंदींच्या आकडेवारीवर आधारित असल्याने प्रत्यक्ष संख्या याहूनही जास्त असेल.

१० अ १ आ २. चार वर्षांत 'लव्ह जिहाद'च्या नावाखाली जवळजवळ ४,००० धर्मांतरे ! : केरळ पोलिसांच्या अहवालानुसार वर्ष २००६ ते २००९ या कालावधीत

Scanned by CamScanner

'लव्ह जिहाद'च्या नावाखाली जवळजवळ ४,००० धर्मांतरे झाली आहेत. यांपैकी मुसलमानबहुल मलाप्पुरम आणि उत्तर भागांतील जिल्ह्यांमध्ये १,६०० धर्मांतरे करण्यात आली.

१० अ १ इ. 'लव्ह जिहाद'विषयी केरळ न्यायालयाची भूमिका

१० अ १ इ १. केरळमधील 'लव्ह जिहाद'विषयी अहवाल सादर करण्याचा आदेश पोलीस महासंचालकांना देणारे केरळ उच्च न्यायालय ! : केरळच्या पट्टनामथिट्टा जिल्ह्यातील दोन महाविद्यालयीन मुली अचानक हरवल्या. या घटनेच्या अन्वेषणासाठी पोलिसांकडून सहकार्य न मिळाल्याने दोन्ही मुलींच्या पालकांनी केरळ उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. तिची दखल घेऊन न्यायालयाने 'या दोन मुलींना न्यायालयात उपस्थित करावे', असा आदेश पोलिसांना दिला. या प्रकरणी शहेनशहा आणि सिराजुद्दीन या दोन मुसलमानांना अटक करण्यात आली. मुसलमान युवकांच्या प्रेमपाशात अडकलेल्या मुलींनाही न्यायालयात आणून त्यांना त्यांच्या पालकांच्या स्वाधीन करण्यात आले. या वेळी न्यायालयात त्या मुलींनी 'या दोन मुसलमान मुलांनी आम्हाला प्रेमात फसवले. इस्लामी केंद्रात आम्हाला धर्मांतरासाठी प्रवृत्त केले', असे सांगितले. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन 'याविषयी चौकशी करून न्यायाधिशांसमोर अहवाल सादर करावा', असा आदेश न्यायालयाने केरळच्या पोलीस महासंचालकांना दिला.' (४९)

१० अ १ इ २. 'लव्ह जिहाद'ला आळा घालण्यासाठी कायदा करण्याची केरळ न्यायालयाची सूचना ! : 'लव्ह जिहाद' प्रकरणी केरळच्या पोलीस महासंचालकांनी न्यायालयासमोर सादर केलेल्या अहवालावर सुनावणी होतांना केरळ उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती के.टी. शंकरन म्हणाले, "या अहवालातून राज्यात वर्ष १९९६ पासून प्रेमाच्या नावाखाली बळाने धर्मांतर करण्याची चळवळ चालू आहे, म्हणजेच केरळमध्ये 'लव्ह जिहाद' अस्तित्वात आहे, हे स्पष्ट होते. या नियोजित धर्मांतराच्या कारवायांमागे 'इस्लामिक पॉप्युलर फ्रंट' आणि त्या संघटनेचा विद्यार्थी विभाग (कॅम्पस फ्रंट) आहे, असे हा अहवाल सांगतो. कोझ्झीकोड जिल्ह्यात इस्लाममध्ये धर्मांतर करणारी केंद्रे आहेत, हेही त्यातून स्पष्ट झाले आहे. घटनेने सर्व धर्मांना समान अधिकार दिला असला, तरी स्वधर्मावरील श्रद्धेचा उपयोग बळाने

Scanned by CamScanner

कोणाचे धर्मांतर करण्यासाठी वापरला जाऊ नये. महाविद्यालयांचा परिसर हे धर्मांतराचे अड्डे बनू नयेत, यासाठी, तसेच आणि राज्यात बलप्रयोगाने होत असलेले धर्मांतर रोखण्यासाठी राज्यशासनाने कायदा करावा." (५०)

१० अ १ ई. 'लव्ह जिहाद'द्वारे केरळचे इस्लामीकरण करण्याच्या कटाविषयी मुख्यमंत्र्यांची स्वीकृती ! : 'पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया' ही संघटना 'लव्ह जिहाद'चा वापर करून केरळचे २० वर्षांत इस्लामीकरण करू पहात आहे.' - व्ही.एस्. अच्युतानंदन, तत्कालीन मुख्यमंत्री, माकप, केरळ. (५१)

१० अ १ ई १. 'लव्ह जिहाद'ची प्रकरणे दडपण्यास पोलिसांना भाग पाडणारे केरळमधील तत्कालीन माकपचे शासन ! : '२.७.२००८ या दिवशी पालघाट (केरळ) येथील प्रेमलता (वय २० वर्षे) आणि तिची मैत्रीण श्रिया यांवर नासीर आणि शमशुद्दीन या मुसलमान तरुणांनी हिंदु नावे सांगून ओळख केली आणि नंतर त्या तरुणींवर बलात्कार केला. ५.७.२००८ या दिवशी झालेल्या प्रकरणाविषयी महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी या मुलींना विचारणा केली. तेव्हा त्यांनी घडलेला सत्य प्रसंग सांगितला. प्राचार्यांच्या खोलीतून बाहेर पडल्यानंतर त्यांची सर्वांसमोर 'स्टुडंटस् फेडरेशन ऑफ इंडिया' या माकपच्या विद्यार्थी शाखेतील विद्यार्थ्यांनी झालेल्या प्रकरणाविषयी थट्टा केली. हा मानभंग सहन न झाल्याने प्रेमलता हिने आत्महत्या केली. या प्रकरणी आम्ही पोलिसांत तक्रार दाखल करताच ते दोघे बलात्कारी मुसलमान अरब राष्ट्रांत पळून गेले. हे प्रकरण गांभीर्याने घेऊन त्याविषयी चौकशी करण्यास आरंभ करणारे पोलीस उपअधीक्षक श्री. रामचंद्रन् यांचे दुसऱ्या दिवशीच स्थानांतर (बदली) करण्यात आले. पालघाट येथील माकपच्या आमदाराने हे प्रकरण दडपण्यासाठी पुढाकार घेतला. या प्रकरणावर गेले १७ महिने कोणतीही कार्यवाही झालेली नाही. मुलीचा शवविच्छेदन अहवालही शासनाने आम्हाला दिलेला नाही.' - शीला कुंजू आणि तृष्णा कुंजू (प्रेमलताचे पालक) (५२)

१० अ १ उ. 'लव्ह जिहाद'च्या केरळमधील घटनांचा अभ्यास करून त्याविषयीचे सत्य सांगणारी 'व्हॉइस ऑफ जस्टीस' ही चेन्नईस्थित अशासकीय संघटना ! : 'व्हॉइस ऑफ जस्टीस' ही चेन्नईस्थित अशासकीय सामाजिक संघटना प्रामुख्याने मानवाधिकारांच्या रक्षणासाठी कार्यरत आहे. 'लव्ह जिहाद'च्या अनेक घटना केरळ

Scanned by CamScanner

राज्यात घडू लागल्यानंतर 'अल्पसंख्यांक नागरिकांना लक्ष्य करण्यासाठी 'लव्ह जिहाद' हे युद्ध किंवा आतंकवाद आहे', हा अपप्रचार आहे आणि हा अपप्रचार राजकीय प्रेरित, म्हणजे हिंदुत्ववादी विचारांच्या पक्षांच्या लाभासाठी केला जात आहे', अशा प्रकारचा आरोप होऊ लागला. या अनुषंगाने 'व्हॉइस ऑफ जस्टीस' या संघटनेने या घटनांमागील सत्य शोधून काढण्यासाठी विविध क्षेत्रांतील मान्यवरांची अभ्यास समिती स्थापन केली. या समितीत न्यायमूर्ती सुरेंद्र भार्गव, जयपूर (माजी मुख्य न्यायाधीश सिक्कीम उच्च न्यायालय); 'आयपीएस्' अधिकारी टी.एस्. राव, हैद्राबाद (माजी पोलीस महासंचालक, आंध्रप्रदेश); ॲड्. गुरुचरणसिंग गील, जयपूर (राजस्थान शासनाचे माजी अतिरिक्त महाधिवक्ता); डॉ. आय.बी. विजयालक्ष्मी, बंगळुरू (एम्.डी, स्त्रीरोगतज्ञ, सामाजिक कार्यकर्त्या आणि लेखिका); डॉ. सुवर्णा रावल, भिवंडी, ठाणे (भटक्या जमातींच्या विकासासाठी कार्यरत अशासकीय संस्थेच्या सदस्या); श्री. पी. गणपती, चेन्नई (उद्योगपती); ॲड्. एस्. रवी, चेन्नई आणि श्री. रमेश गर्ग (औषधनिर्माण क्षेत्रातील सल्लागार) सहभागी झाले होते. या समितीने केरळ राज्यांत सर्वत्र फिरून 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या मुली, अशा मुलींचे पालक आणि या विषयाशी संबंधित सामाजिक कार्यकर्ते अन् संघटना यांच्या प्रत्यक्ष भेटी घेतल्या. या अभ्यासानंतर 'व्हॉइस ऑफ जस्टीस'च्या अभ्यास समितीने 'लव्ह जिहाद'ची सत्यता सांगणारा 'लव्ह जिहाद : मिथ ऑर रिॲलिटी' हा अहवाल प्रसिद्ध केला.

१० अ १ उ १. 'व्हॉइस ऑफ जस्टीस'च्या 'लव्ह जिहाद : मिथ ऑर रिॲलिटी' या अहवालातील निष्कर्ष

१. 'लव्ह जिहाद'विषयी वृत्तपत्रांत प्रसिद्ध होणाऱ्या घटना या सत्य असून त्या वस्तूस्थितीच्या आधारावर प्रसिद्ध होत आहेत.

२. 'लव्ह जिहाद'शी संबंधित घटनांच्या कार्यपद्धतीमध्ये मोठ्या प्रमाणात साम्य आहे. भ्रमणभाषवरून संपर्क करणे, 'मिस कॉल' देणे, लघुसंदेश (एस्एम्एस्) आदी पद्धतींद्वारेच बहुतांश प्रेम प्रकरणांना आरंभ झाला आहे. या घटनांतील पहिला टप्पा निव्वळ प्रेम हा असला, तरी ते स्थिर झाल्यानंतर मात्र धर्मांतराच्या प्रक्रियेस आरंभ होतो. काही घटनांमध्येच धर्मांतरापर्यंत प्रकरण पुढे गेले असले, तरी त्या घटना आणि अन्य घटना यांतील पहिल्या प्रक्रिया सारख्याच आहेत.

Scanned by CamScanner

३. बहुतांश घटनांमध्ये भ्रमणभाषची 'रिचार्ज' सेवा पुरवणाऱ्या दुकानांमधून हिंदु मुलींचे भ्रमणभाष क्रमांक मुसलमान तरुणांनी मिळवले असल्याचे स्पष्ट होते. तसेच 'आईस्क्रीम पार्लर' अन् 'ज्यूस सेंटर' ही ठिकाणे हिंदु मुली आणि मुसलमान मुले यांच्या भेटीची पहिली ठिकाणे असतात.

४. या प्रकरणांसाठी विदेशी निधी मिळण्याची, या प्रकरणांत धर्मांतरित झालेल्या मुली आतंकवाद्यांना भेट दिल्या जाण्याची वा आतंकवादी कारवायांसाठी त्या वापरल्या जाण्याची, तसेच त्यांची वेश्याव्यवसायासाठी विक्री होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा घटनांची त्या दृष्टीकोनातून चौकशी झाली पाहिजे.

मुसलमान मुलांची आर्थिक परिस्थिती जेम-तेम असूनही ते हिंदु मुलींना भ्रमणभाषसारख्या वस्तू भेट म्हणून देतात आणि त्यांना फिरवण्यासाठी दुचाकी आणि चारचाकी वाहने वापरतात, या गोष्टी त्यांना विदेशी शक्तींकडून अर्थसाह्य होत असल्याच्या संशय आणतात.

५. 'अशा प्रकरणांमध्ये मुसलमान तरुणांना त्यांचे पालक प्रत्यक्ष साहाय्य करत आहेत', असे दिसत नसले, तरी त्या समाजातील तरुणांना त्यांचे सहकारी तरुण आणि प्रौढ व्यक्ती केवळ बाह्यतःच साहाय्य करत नाहीत, तर प्रसंगी समाजामध्ये आतंकही निर्माण करतात.

६. अशा प्रकारच्या बहुतांश प्रकरणात सत्य कळल्यावर मुली अत्यंत दुःखी होतात; मात्र त्या वेळी अशा पीडित मुलीला स्वीकारण्यास हिंदु पालक इच्छुक नसल्याने मुली आत्महत्येचा पर्याय स्वीकारतात वा नरकसमान जीवन असाहाय्यपणे जगतात, असे दिसून आले आहे.

७. अशा प्रकरणांच्या संदर्भात वरपासून खालपर्यंतच्या पदांवरील पोलीस ही प्रकरणे मोडून काढण्यापेक्षा ती लपवून ठेवण्यातच धन्यता मानतात, असे दिसून आले आहे. राजकारण्यांचाही 'मतपेट्यांवर परिणाम होऊ शकेल', अशा दृष्टीने त्याकडे पहाण्याचा दृष्टीकोन असतो, असेही आढळले आहे.

८. समाजावर दीर्घकाल परिणाम करणाऱ्या या घटनांविषयी शासन मात्र गंभीर नाही. अशा प्रकारच्या घटना केरळ सोडून अन्य राज्यांतही होत असल्याची शक्यता नाकारता येत नाही; कारण तशा आशयाच्या बातम्या प्रसारमाध्यमे आणि संकेतस्थळे यांवर प्रसिद्ध होत आहेत. या अनुषंगाने पुढील चौकशी व्हायला हवी.

Scanned by CamScanner

९. या सर्व घटनांमधील महत्त्वाचे साम्य, म्हणजे प्रियकर हे सश्रद्ध मुसलमान असून फसलेल्या मुली हिंदू किंवा ख्रिस्ती धर्मीय आहेत. केरळ राज्यात हिंदु, मुसलमान आणि ख्रिस्ती यांच्या लोकसंख्येचे प्रमाण जवळजवळ सारखे असून या तिन्ही समाजांनी जातीय सलोखा जपलेला आहे. अशा प्रकारच्या घटनांमुळे सामाजिक ऐक्य दुभंगण्याची शक्यता असून परिणामी राज्यामध्ये कायदा अन् सुव्यवस्था यांचा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो.

१० अ १ उ २. 'व्हॉइस ऑफ जस्टीस'च्या अभ्यास समितीने केलेल्या सूचना !

१. शाळा-महाविद्यालयांत या विषयासंबंधी व्याख्याने, चर्चासत्रे, जागृतीपर कार्यक्रम आदी आयोजित केली पाहिजेत. यासाठी सामाजिक कार्यकर्ते, शाळा-महाविद्यालयांचे व्यवस्थापन विभाग आणि स्वतः शासनाने पुढाकार घेतला पाहिजे.

२. पालकांनी आपल्या मुलींना याविषयी संबंधी सल्ला देण्यासाठी, समुपदेशन देण्यासाठी, तसेच जागृती करण्यासाठी मानसशास्त्रज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि पोलीस अधिकारी यांच्या अनुभवाचा लाभ घेतला पाहिजे.

३. 'लव्ह जिहाद'ची प्रकरणे हाताळण्यासाठी वा त्यांचा शोध घेण्यासाठी जिल्हा अन् राज्य स्तरावर पोलिसांची विशेष शाखा स्थापली पाहिजे. पोलीस पथकांच्या साहाय्यासाठी आणि सामाजिक सलोखा जपण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात समुपदेशन समिती स्थापली पाहिजे.

४. 'लव्ह जिहाद'साठी विदेशातून होणारा अर्थपुरवठा, मुलींची तस्करी आणि त्यांचा आतंकवादी कारवायांसाठी वापर यांची केंद्रशासनाने उच्च स्तरीय चौकशी करून हा कट हाणून पाडण्यासाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे.

५. अवैध धर्मांतर रोखण्यासाठी धर्मांतरबंदी कायदा केला पाहिजे.

६. मानवाधिकार संघटनांनीही या प्रकरणात महत्त्वाचा पुढाकार घेऊन अशा घटनांवर प्रतिबंध आणला पाहिजे. (५३)

१० अ २. कर्नाटक : श्रीराम सेनेचे अध्यक्ष श्री. प्रमोद मुतालिक यांनी वर्ष २००९ मध्ये दिलेल्या माहितीनुसार कर्नाटकमध्ये ३६,००० हिंदु तरुणी 'लव्ह जिहाद'ला बळी पडल्या आहेत, तर बेळगाव नगरात प्रतिदिन एक हिंदु तरुणी 'लव्ह जिहाद'च्या विळख्यात फसते. बेंगळुरू येथील 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या एका

Scanned by CamScanner

हिंदु तरुणीची सुटका करण्यात आल्यावर 'माझ्यासारख्या ५० मुलींना सध्या बेंगळुरू येथील मदरशात डांबून ठेवण्यात आले आहे', असे तिने सांगितले.

१० अ २ अ. कर्नाटकमध्ये घडलेल्या 'लव्ह जिहाद'च्या काही घटना

१. कोलार जिल्ह्यातील कटारीपल्या या भागात रहाणाऱ्या एका हिंदु व्यावसायिकाच्या अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या २० वर्षीय मुलीला त्यांच्या शेजारी सायकल दुरुस्तीचे काम करणाऱ्या मुसलमान तरुणाने फूस लावून पळवून नेले.

२. 'म्हैसुरू येथे एका अल्पवयीन हिंदु विद्यार्थिनीला अझीम हाफिझ (वय २२ वर्षे) या अट्टल चोराने फूस लावून पळवून नेले आणि तिचे बळाने धर्मांतर करून 'निकाह' केला. त्यानंतर दहा दिवसांनी पोलिसांनी अझीमच्या कचाट्यातून या मुलीची सोडवणूक केली आणि हा प्रकार 'लव्ह जिहाद' असल्याचे उघड केले.' (५४)

१० अ २ आ. 'लव्ह जिहाद' प्रकरणात मुसलमान गुंतले असतांनाही त्यांच्या विरोधात तक्रारी न नोंदवून कारवाई टाळणारे मुसलमानधार्जिणे पोलीस ! : 'लव्ह जिहाद'ची अनेक प्रकरणे उघडकीस येत असूनही कर्नाटक पोलीस न्यायालयात मात्र 'लव्ह जिहाद'च्या विरोधात एकही पुरावा नाही', असे सांगत आहेत. 'लव्ह जिहाद'च्या सर्व प्रकरणांमध्ये मुसलमान तरुण गुंतलेले असल्याने पोलीस ठाण्यात त्यांच्या विरोधात तक्रारी नोंदवून घेतल्या जात नाहीत.' - श्री. प्रमोद मुतालिक, संस्थापक, श्रीराम सेना. (५५)

१० अ २ इ. 'लव्ह जिहाद'च्या प्रकरणांना राष्ट्रीय महत्त्व असल्याचे सांगणारे कर्नाटक उच्च न्यायालय ! : 'कर्नाटकमधील चामराजनगर जिल्ह्यात रहाणाऱ्या सेल्वराज या हिंदु गृहस्थाची मुलगी सिल्जराज एक वर्षापासून हरवली (बेपत्ता) होती. केरळ उच्च न्यायालयाच्या निकालपत्राचा आधार घेत सेल्वराज यांनी 'आपली मुलगी केरळमधील एका मुसलमान युवकाने पळवून नेली आहे', अशी तक्रार करत कर्नाटक उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. न्यायालयीन आदेशानंतर पोलिसांनी सिल्जराजला शोधून न्यायालयात उपस्थित केले. तेव्हा तिचे 'इस्लामचे प्रशिक्षण' चालू होते. 'मी मुसलमान होणार आहे आणि माझा कण्णूर येथील अक्सर याच्याशी निकाह झालेला आहे', असे तिने न्यायालयाला सांगितले. यानंतर कर्नाटक

Scanned by CamScanner

उच्च न्यायालयातील न्यायमूर्ती के. श्रीधर राव आणि न्यायमूर्ती रवी मलीम यांनी कर्नाटक राज्यशासनाला या सर्व प्रकाराची कसून पडताळणी करण्याचा आदेश दिला. 'या प्रकरणांना राष्ट्रीय महत्त्व आहे', असे न्यायमूर्तीद्वयींनी नमूद करतांनाच "कर्नाटक पोलिसांनी केरळ पोलिसांसह काम करून या प्रकरणाचा छडा लावावा", अशी सूचना केली.' - डॉ. श्रीरंग गोडबोले, पुणे (५६)

१० अ ३. महाराष्ट्र : राज्यातील 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या तरुणींचा अधिकृत आकडा मिळालेला नसला, तरी संभाजीनगरमध्ये '२०० रुपये प्रतिदिन घ्या आणि हिंदु मुली बाटवा', हा फतवा निघाल्यापासून अशा प्रकारच्या घटना वाढल्या आहेत. वर्ष २०१० मध्ये जळगाव येथे 'लव्ह जिहाद' करणाऱ्या १३ मुसलमान मुलांची टोळी सापडली. त्यांनी अनेक हिंदु तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून फसवले. मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, कोल्हापूर, परभणी, नांदेड, संभाजीनगर, जालना, बीड, धाराशिव (उस्मानाबाद), अकोला या जिल्ह्यांमध्ये मुसलमान तरुणांनी हिंदु मुलींना प्रेमाच्या जाळ्यात ओढल्याच्या घटना घडल्या आहेत. ('लव्ह जिहाद'च्या महाराष्ट्रातील काही घटना या पुस्तकातील अनुक्रमांक - ५ अ १, ५ आ १, ७ ए, ७ क, ८ इ - येथे दिल्या आहेत.)

१० अ ३ अ. 'लव्ह जिहाद'विषयी महाराष्ट्र शासनाची लपवाछपवीची भूमिका ! : 'महाराष्ट्रातील वाढत्या 'लव्ह जिहाद'च्या घटनांविषयी विरोधी पक्षांनी महाराष्ट्राच्या विधानसभेत धारेवर धरल्यावर महाराष्ट्राचे गृहराज्यमंत्री नितीन राऊत यांनी त्याविषयी चौकशी करण्याचे आश्वासन दिले होते; मात्र अल्पसंख्यांक आयोगाचे अध्यक्ष नसीम सिद्दीकी यांनी 'शासनाला असा हस्तक्षेप करण्याचा कोणताही अधिकार नाही. त्यामुळे अशी चौकशी करू नये', अशी प्रतिक्रिया व्यक्त करून त्यांच्यावर दबाव आणला.

त्यानंतर नितीन राऊत एका पत्रकार परिषदेत म्हणाले, "परस्परसंमतीने होणाऱ्या हिंदु-मुसलमान सज्ञानांच्या विवाहांमध्ये शासन हस्तक्षेप करूच शकत नाही. त्यामुळे हिंदु मुलींशी मुसलमानांच्या होणाऱ्या विवाहांची चौकशी करण्याचा कोणताही आदेश देण्यात आलेला नाही. मुसलमान तरुणांच्या टोळ्या हिंदु मुलींना फसवून धर्मांतरित करत असल्याविषयी तीव्र असंतोष व्यक्त करण्यात येत असला, तरी अशा टोळ्या कार्यरत नाहीत." (५७)

Scanned by CamScanner

१० अ ४. गोवा : 'राज्यातील मडगाव या नगरातून दोन मुलींना फूस लावून काश्मिरी मुसलमान युवकांनी पळवून नेल्याची नोंद कोलवा पोलिसांनी केली. वर्ष २०१० मध्ये अशा चार घटना तेथे घडल्या.' (५८)

१० अ ५. गुजरात : या राज्यातही 'लव्ह जिहाद'ने जाळे पसरले असल्याची एक प्रातिनिधिक घटना पुढे दिली आहे.

अ. 'कर्णावती (अहमदाबाद) येथील एका २३ वर्षीय हिंदु तरुणीने मुझफ्फर नवाझ हुसेन या मुसलमानाच्या विरोधात २१.८.२०१० या दिवशी पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या तक्रारीमध्ये म्हटले आहे, "परदेशात काम (नोकरी) देण्याचे, तसेच माझ्याशी विवाह करण्याचे आश्वासन देऊन मुझफ्फर याने मला त्याच्याशी शारीरिक संबंध ठेवण्यास भाग पाडले. मी बालकाला जन्म दिल्यानंतर त्याने मला सोडून दिले." (५९)

१० अ ६. राजस्थान : 'राज्यातील मारवाडी आणि जैन समाजातील मुली मोठ्या प्रमाणात 'लव्ह जिहाद'ला बळी पडत आहेत. 'जैन इंटरनॅशनल वूमेन ऑर्गनायझेशन'च्या महिला संघटक साध्वी श्री मयणा श्रीजी यांनी दिलेल्या माहितीनुसार जैन समाजातील २०० पेक्षा जास्त युवती 'लव्ह जिहाद'ला बळी पडून मुसलमान झाल्या आहेत.' (६०)

१० अ ६ अ. कोटा येथे मुसलमान मुलांना 'लव्ह जिहाद'चे प्रशिक्षण दिले जाणे : 'एका मुसलमान मुलाने बिकानेर येथील एका ब्राह्मण मुलीला प्रेमपाशात अडकवून काश्मीरमध्ये पळवून नेले. तेथे गेल्यावर मुलाचा हेतू लक्षात येताच ती मुलगी बिकानेरला परतली आणि तिने पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार नोंदवली. तिच्या माहितीवरून बिकानेर पोलिसांनी त्या मुसलमान मुलाला पकडले. पोलिसांनी धाक दाखवून बोलते केल्यावर त्याने 'लव्ह जिहाद'चे प्रशिक्षण कोटा या राजस्थानच्या शैक्षणिक नगरात घेतल्याचे सांगितले.' - प.पू. सुरजनदासजी महाराज, 'रामस्नेही संप्रदाय', पाली, राजस्थान.

१० अ ७. उत्तरप्रदेश : राज्यातील मेरठ, मुझफ्फरनगर, बुलंदशहर, बागपत, सहारनपूर आणि मुरादाबाद या जिल्ह्यांमध्ये मुसलमान तरुणांनी हिंदु तरुणींना प्रेमजालात ओढून विवाह करण्याच्या घटनांमध्ये अचानक वाढ झाली आहे. सप्टेंबर

Scanned by CamScanner

आणि ऑक्टोबर २०१० या दोन महिन्यांत मेरठ जिल्ह्यात मुसलमान तरुणांनी हिंदु तरुणींना पळवून नेल्याच्या ९ घटना घडल्या. 'काही मुसलमान युवक गुप्त कटाचा एक भाग असल्याप्रमाणे हिंदु तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढत आहेत', असे गुप्तचर अधिकाऱ्यांचे मत आहे.

१० अ ७ अ. 'लव्ह जिहाद'मध्ये मुसलमान आमदाराच्या पुतण्यांचा सहभाग : '१४.२.२००९ या दिवशी बुलंदशहर येथे स्थानिक आमदार हाजी अलीम यांचे पुतणे अशरफ, अकरम, असलम आणि फैजउल हसन यांनी सोनम नावाच्या हिंदु तरुणीला फूस लावून पळवून नेले. त्यामुळे गुर्जर समाजाच्या लोकांनी बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांसह आमदाराच्या घरावर आक्रमण केले. या वेळी झालेल्या झटापटीत अनेक लोक घायाळ झाले. आमदाराचा भाऊ यूनुस याने या वेळी हवेत गोळीबार केला. या घटनेमुळे आठवडाभर त्या ठिकाणी अघोषित संचारबंदीसारखी स्थिती निर्माण झाली होती.' – ममता त्रिपाठी, स्तंभलेखक (६१)

१० अ ८. बंगाल : 'लव्ह जिहाद'च्या घटना बंगालमध्ये घडत असल्याचे उदाहरण म्हणजे वर्ष २००९ मध्ये गाजलेले रिझवान-उर-रहमान याच्या हत्येचे प्रकरण. कोलकाता येथे रिझवान-उर-रहमान या मुसलमानाने तेथील 'लक्स कोझी' या नामांकित आस्थापनाचे प्रमुख श्री. अशोक तोडी यांच्या मुलीला प्रेमाच्या जाळ्यात फसवून तिच्याशी 'निकाह' केला होता. त्यानंतर काही दिवसांतच रिझवान-उर-रहमानची हत्या झाली.

१० अ ८ अ. केरळ आणि बंगाल या राज्यांत 'लव्ह जिहाद' वाढण्याचे कारण साम्यवादी विचारांचे माकप शासन ! : केरळमध्ये घडलेल्या 'लव्ह जिहाद'च्या प्रकरणांसारख्या तक्रारी बंगालमध्येही वाढत असल्याचे २४.९.२००९ या दिवशी 'bengalspotlight.blogspot.com' या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाले होते. या घटना केरळ आणि बंगाल या राज्यांत वाढण्याच्या काळात तेथे साम्यवादी विचारांचे माकप शासन सत्तेवर होते. या साम्यवादी राज्यांत मुसलमान मूलतत्त्ववादी आणि 'सिमी', 'सिओ, 'जेल', 'हुजी', 'हिजबूल मुजाहिदीन' आदी आतंकवादी संघटना, तसेच 'आएस्आय' या पाकच्या गुप्तचर संस्थेच्या हस्तकांना मुक्त रान मिळत असून ही मंडळी अशासकीय संस्था उभ्या करून त्यांच्या माध्यमातून हे कार्य करत आहेत, असे या संकेतस्थळावर म्हटले होते. (६२)

Scanned by CamScanner

१० आ. राष्ट्रीय

१० आ १. 'विश्व हिंदु परिषदेकडे उपलब्ध असलेल्या माहितीनुसार वर्ष २००९ पर्यंत १ लक्ष २० सहस्र हिंदु मुली 'लव्ह जिहाद'ला बळी पडून धर्मांतरित झाल्या आहेत.' (६३)

१० आ २. 'लव्ह जिहाद'च्या राष्ट्रव्यापी कटाविषयी केंद्रीय गृहखात्याचा खोटारडेपणा ! : 'देशभरात 'लव्ह जिहाद'संबंधी अनेक घटना घडूनही - 'लव्ह जिहाद'सारखी चळवळ देशात चालू आहे', अशी माहिती केंद्रशासनाला उपलब्ध नाही', असे केंद्रीय गृहखात्याने केरळ उच्च न्यायालयात सांगितले.' (६४)

१० इ. आंतरराष्ट्रीय

१० इ १. पाकिस्तान : 'येथे विशेषतः सिंध प्रांतात हिंदु स्त्रिया पळवून नेऊन त्यांचे धर्मांतर करण्याचे प्रकार वाढले आहेत. वर्ष २०१० च्या आरंभी अनुमाने ३० ते ३५ हिंदु स्त्रिया अपहृत झाल्या. जवळजवळ १८ हिंदु मुलींचे बळाने इस्लाममध्ये धर्मांतर करून 'निकाह' लावण्यात आले.' (६५)

१० इ २. इंग्लंड : 'येथील पाकिस्तानी वंशाचे मुसलमान हिंदु आणि शीख समाजाच्या मुलींना फसव्या प्रेमात अडकवून त्यांची अश्लील छायाचित्रे काढतात, तसेच त्या मुलींनी धर्मांतरित होण्यासाठी बळाचा वापर करतात', असे वृत्त 'टाइम्स ऑनलाईन डॉट कॉम' या संकेतस्थळाने प्रसिद्ध केले आहे.' (६६)

१० इ २ अ. हिंदु आणि शीख पालकांना सावध रहाण्याचा पोलिसांचा सल्ला : 'हिंदु फोरम ऑफ ब्रिटन'च्या माहितीनुसार फेब्रुवारी २००७ पर्यंत तेथील १०० हिंदु मुली या कारस्थानाला बळी पडल्या. या संघटनेने आयोजित केलेल्या बैठकीत हिंदु आणि शीख पालकांना लंडनचे पोलीस आयुक्त सर इयान ब्लेअर यांनी "मुसलमानांना हिंदु आणि शीख तरुणी यांना प्रेमाच्या जाळ्यात ओढण्यासाठी अनुक्रमे ५ सहस्र पौंड आणि १० सहस्र पौंड दिले जात असून तुम्ही सावध रहा", असे स्पष्टपणे सांगितले.' - 'डेलीमेल', इंग्लंड. (२२.२.२००७)

१० इ ३. मलेशिया : 'या देशात जुलै २०१० पर्यंत 'लव्ह जिहाद'च्या माध्यमातून ३३,००० हिंदु मुली धर्मांतरित झाल्या.' - सावरकर टाइम्स (जुलै २०१०)

Scanned by CamScanner

११. 'लव्ह जिहाद' वेगाने फोफावण्यामागील काही कारणे

'लव्ह जिहाद'ला आळा घालायचा असेल, तर तो वेगाने फोफावण्यामागील कारणांचा अभ्यास करणे आवश्यक आहे.

११ अ. हिंदु मुलींच्या अयोग्य कृती आणि अज्ञान

११ अ १. मुसलमान मुलांवर पटकन विश्वास ठेवणे : 'एका पाकिस्तानी वंशाच्या मुसलमानाने सांगितले, "हिंदु मुलींना फसवणे सोपे असते; कारण त्या भोळ्या असतात आणि कोणत्याही गोष्टीवर पटकन विश्वास ठेवतात. त्यांच्याशी गोड बोलून त्यांची खोटी स्तुती केली की, त्यांना आम्ही 'जिहादी' त्यांचेच वाटतो." - सौ. दुर्गा सरदेसाई, अमेरिका

११ अ २. मुलींचे अल्लड वय : 'लव्ह जिहाद'च्या बळी ठरलेल्या बहुतेक हिंदु मुली या १३ ते १८ वर्षे वयोगटातीलच असतात. या अल्लड वयातील मुलींना मुसलमान फूस लावून प्रेमाच्या जाळ्यात ओढतात आणि त्यांच्यावर बलात्कार करतात. त्या मुली अल्पवयातील लैंगिक आकर्षणामुळे 'काय चांगले अन् काय वाईट' यांतील भेद जाणत नाही. त्यामुळे त्यांचा पाय प्रेमात घसरतो.' (६७)

११ अ ३. मुसलमानांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्याशी विवाह करणे : काही हिंदु युवतींना इस्लामी क्रौर्याचा इतिहास ज्ञात असतो; पण 'एका तरी मुसलमानाला आपण राष्ट्रीय प्रवाहात आणून त्याची मानसिकता पालटू शकतो', असा अपसमज त्या अननुभवी वयात करून घेतात आणि स्वतःच्या आयुष्याचा घात करून घेतात.

११ अ ४. मुसलमानांना पौरुषत्व असलेले आणि हिंदूंना पौरुषत्वहीन समजणे : 'मुसलमानांच्या प्रेमपाशात अडकलेल्या मुलींचे प्रबोधन करायला गेले, तर त्या "मुसलमान पौरुषत्व असलेले (मर्द) आहेत, तर हिंदु 'नामर्द (पौरुषत्वहीन) असतात", असे सांगून हिंदूंच्या पुरुषार्थालाच आव्हान देतात.' (६८)

११ अ ५. इस्लामी आक्रमकांचा इतिहास ज्ञात नसणे : हिंदु मुली 'लव्ह जिहाद'ला बळी पडतात, याचे एक प्रमुख कारण म्हणजे त्यांना इस्लामी आक्रमकांनी १,३०० वर्षे हिंदुस्थानवर केलेले अत्याचार आणि इस्लामची जिहादी विचारसरणी यांचे ज्ञान नसते, हे होय.

Scanned by CamScanner

११ अ ६. हिंदु धर्माचे महत्त्व ज्ञात नसणे : हिंदु मुलींना हिंदु धर्माचे महत्त्व ज्ञात नसणे, हेही त्या 'लव्ह जिहाद'ला बळी पडण्यामागील महत्त्वाचे कारण आहे. अशा मुलींकडून धर्मपालन केले जात नसल्याने त्यांच्यात हिंदु धर्माविषयी अभिमान नसतो आणि म्हणूनच त्या परधर्मात जाण्यास सिद्ध होतात.

११ आ. हिंदु पालकांच्या अयोग्य कृती

११ आ १. मुलींना अनिर्बंध स्वातंत्र्य देणे : पालकांकडून हिंदु मुलींना दिले जाणारे अनिर्बंध स्वातंत्र्य अन् त्यांना पाश्चात्त्य संस्कृतीचे अंधानुकरण करण्यासाठी दिली जाणारी मुभा, यांमुळे त्या मुली पालकांना पुढे पुढे जुमानीत नाहीत.

११ आ २. मुलींना भावनिक आधार देण्यास अपयशी ठरणे : 'एका सर्वेक्षणानुसार एकट्या किंवा अलीप्त रहाणाऱ्या मुली 'लव्ह जिहाद'च्या जाळ्यात फसण्याचे प्रमाण जास्त आहे. ज्या मुलींना भावनिक आधार मिळत नाही, त्या मुली तो आधार बाहेर शोधण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक मुलीला तिच्या डोक्यावर हात फिरवून आस्थेने चौकशी करणारे आणि तिचे बोलणे ऐकणारे पालक हवे असतात.

११ आ ३. 'सर्वधर्मसमभाव' जपण्यासाठी मुसलमानांचे खरे स्वरूप दाखवणाऱ्या घटना मुलींपर्यंत पोहोचू न देणे : एका मारवाडी संमेलनात 'लव्ह जिहाद'मध्ये फसलेल्या मुलींच्या पालकांनी "आमच्या मुली धार्मिक विचारांच्या होत्या. पूजा-अर्चा आणि उपवास करायच्या, तरीही त्या मुसलमानांसमवेत पळून गेल्या", अशा शब्दांत त्यांची व्यथा मांडली. हेच पालक पूर्वी 'सर्वधर्मसमभाव'चे खोटे तत्त्वज्ञान समाजाला सांगत असत. परिस्थितीमुळे कधी हिंदु-मुसलमान प्रश्न समोर आलेच, तर मुलीशी बोलतांना "ते तुझे विषय नाहीत, ते राजकारण असते. तू तुझ्या भवितव्याकडे लक्ष दे", असा 'सर्वधर्मसमभावी' उपदेश ते करत.

११ आ ४. मुलगी आधुनिक विचारांची असल्याचा आत्मघातकी अभिमान बाळगणे : काही पालक त्यांची मुलगी कुठल्या 'पार्ट्यां'मध्ये जाते, कुठल्या स्तराच्या मुलांसह सहलीला जाते, कुठले चित्रपट पहाते, कुठल्या कार्यक्रमांत भाग घेते आदींची कधीही चिकित्सा करत नाहीत. उलट 'त्यांची मुलगी आधुनिक विचारांची आहे', याचा त्यांना आत्मघातकी अभिमान असतो.'

– श्री. समीर दरेकर [६९]

Scanned by CamScanner

११ आ ५. प्रतिमा कलंकित होण्याच्या भयापोटी हतबल भूमिका ! : 'लव्ह जिहाद'ला मुलगी बळी पडल्यास त्याविषयी आई-वडील पोलिसांत तक्रार नोंदवतात; पण समाजात स्वतःची प्रतिमा कलंकित होण्याच्या भीतीमुळे न्यायालयाच्या बाहेरच ते प्रकरण मिटवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो.' - ममता त्रिपाठी, स्तंभलेखक (७०)

११ इ. हिंदु समाजाच्या अयोग्य कृती

११ इ १. 'मला काय त्याचे' अशी वृत्ती : 'एका हिंदु घरातील मुलगी मुसलमानाने पळवून नेल्यावर 'आपल्या घरातील मुलीबाळी तर सुरक्षित आहेत ना ? मग कशाला करायचा विचार ?', असा विचार अन्य हिंदूंच्या मनात असतो.' (७१)

११ इ २. धर्मनिरपेक्षतेचा अतिरेकी विचार करणे : 'मुसलमान पळवत असलेल्या हिंदु तरुणींचा टाहो हिंदु समाजातील काहींना ऐकूच येत नाही; कारण त्यांनी सहजासहजी न वितळणारे धर्मनिरपेक्षतेचे उष्ण शिसे कानांच्या दोन भोकांत ओतून घेतलेले असते.

११ इ ३. हिंदु धर्मावरील संकटांविषयी काही देणे-घेणे नसणे : हिंदु समाज आपापसांत भांडण्यात धन्यता मानतो. एकमेकांची उणी-दुणी काढण्यात मोठेपणा मानतो. वेगवेगळ्या हिंदु संघटना आणि संस्था यांत स्वतःचे अस्तित्व जपण्याचा अधिक प्रयत्न करतो. हिंदु धर्म आणि त्याच्यावर आलेली संकटे यांविषयी त्याला काही देणे-घेणे नसते.' (७२)

११ इ ४. पळवून नेलेली मुलगी परत आणण्याचे धाडस न दाखवणे : 'मुसलमान युवकाने मुलगी पळवून नेली, तर तिला सोडवून आणण्याची धमक हिंदु समाज दाखवत नाही. हरणांच्या कळपावर आक्रमण करून त्यातील उमदे हरीण त्या कळपासमोरच वाघ हिंस्रतेने फाडतो आणि फस्त करतो; परंतु अगतिकतेने ते पहात बसण्यापलीकडे त्या कळपास काहीच करता येत नाही. अगदी तशीच अवस्था हिंदु समाजाची झाली आहे. 'पोरगी माझ्यासाठी मेली', असे म्हणून हात झटकून आपल्या दैनंदिन कामकाजात व्यस्त रहाणे, यात कोणताही पुरुषार्थ नाही.

११ इ ५. संघटितपणे लढा देण्याची मानसिकता नसणे : 'लव्ह जिहाद'च्या कथा ऐकून हिंदु समाजातील बहुतांशांच्या मुठी आवळतात; पण त्याविरुद्ध संघटितपणे लढा देण्याची मानसिकता कोणीही दाखवत नाही.' (७३)

Scanned by CamScanner

११ ई. मतांध राजकीय पक्ष ! : 'मुसलमानांची मते गमावण्याचे भय असल्याने 'लव्ह जिहाद'चे आक्रमण मोडण्याचे धाडस कोणत्याही राजकीय पक्षात नाही.' (७४)

१२. हिंदु तरुणींनो, खोट्या प्रेमाला बळी पडून आत्मघात करू नका !

१२ अ. शिलापेक्षा अधिक मौल्यवान गोष्ट कुठलीही नाही, हे सदा स्मरणात ठेवा ! : मुसलमान तरुण हिंदु तरुणींना विवाहाचे आमिष दाखवून त्यांच्यावर वारंवार बलात्कार करतात. एकदा शील भ्रष्ट झाले, तर ते पुन्हा मिळवता येत नाही आणि स्त्रीच्या जीवनात तिच्या शिलापेक्षा अधिक मौल्यवान गोष्ट कुठलीही नाही. अल्लाउद्दीन खिलजीसारख्या मुसलमानांपासून स्वतःचे शील रक्षिण्यासाठी संपूर्ण शरीरच अग्नीच्या स्वाधीन करणाऱ्या रजपूत स्त्रिया याच आपल्या आदर्श आहेत.

१२ आ. धर्मांतर केल्याने होणारी हानी लक्षात घ्या ! : 'स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ।' या श्रीमद्भगवद्गीतेतील वचनानुसार 'स्वधर्मच श्रेष्ठ असतो. परधर्मात जाणे, हे अत्यंत भयावह (नरकसमान) असते.' हिंदु म्हणून जन्माला येऊन इस्लाम धर्म स्वीकारणाऱ्या मुलींच्या मनावर हिंदु धर्माचे संस्कार असतात. त्यामुळे त्यांना इस्लाम धर्माप्रमाणे कृती करणे अतिशय अवघड जाते.

हिंदु तरुणींनो, तुम्हाला हे ठाऊक आहे का ?

१. विवाह झाल्यावर मुसलमान नवरा तुमच्यावर बुरख्याची सक्ती करू शकतो. पाकच्या माजी पंतप्रधान बेनझीर भुत्तो लंडनमध्ये असेपर्यंत 'जीन्स' घालत होत्या. विवाह झाल्यानंतर त्यांना तोंडावर बुरखा घ्यावा लागला.

२. हिंदु पती कुटुंबनियोजन मानतो, तर मुसलमान नवरा तुम्हाला 'मुले प्रसवण्याचे यंत्र' समजतो.

३. हिंदूंसाठी 'द्विभार्या प्रतिबंधक कायदा' आहे. इस्लाममध्ये एका वेळी चार बायका करता येतात. पाचवी बायको करायची असेल, तर पहिल्या चौघींपैकी एकीला तोंडी तलाक दिला जातो.

४. हिंदु स्त्रीला घटस्फोटानंतर कायदेशीर पोटगी मिळते, तर मुसलमानाने तलाक दिल्यावर पत्नीला कवडीही मिळत नाही.

Scanned by CamScanner

१२ इ. हिंदु धर्माचे श्रेष्ठत्व लक्षात घ्या ! : विश्वात हिंदु धर्म हा महान असून तो ईश्वरप्राप्ती करून देणारा एकमेव धर्म आहे. तत्कालिक सुख मिळवण्यासाठी परधर्मात जाणे, म्हणजे स्वतःच्या पारलौकिक जीवनाचा शेवट करण्यासारखे आहे.

१२ ई. धर्मद्रोहाचे पातक माथी घेऊ नका ! : हिंदु धर्म संपवण्याचे स्वप्न बाळगणाऱ्यांना साथ देणे, हा धर्मद्रोह आहे. त्याचे पातक भोगावे लागते.

१२ उ. हिंदु तरुणींनो, सबला बना ! : मुसलमानांनी बळाचा वापर केल्यामुळे अनेक हिंदु तरुणी 'लव्ह जिहाद'ला बळी पडतात. स्वा. सावरकरांनी 'माझे मृत्यूपत्र'मध्ये त्यांच्या वहिनीला लिहिलेल्या पत्रात म्हटले होते, 'तें भारतीय अबला-बलतेज कांही । अद्यपि ह्या भरतभूमींत लुप्त नाही । हें सिद्ध होईल ।' म्हणजे 'भारतीय नारीतील बलतेज अद्याप लुप्त झालेले नाही. ते निश्चितपणे जागृत होईल.'

स्वा. सावरकरांना अपेक्षित असलेले ते बल अन् तेज जागृत करण्यासाठी हिंदु तरुणींनो, सबला बना !

१३. हिंदु तरुणींनी आणि स्त्रियांनी घ्यावयाची दक्षता

१३ अ. कठीण प्रसंगी उपस्थित हिंदूंकडून साहाय्य मिळावे, यासाठी कपाळावर प्रतिदिन कुंकू लावा !

१३ आ. वासनांधांपासून स्वरक्षण करण्यासाठी कराटे, नानचाकू आदी स्वसंरक्षण तंत्रांचे प्रशिक्षण घ्या !

१४. हिंदु पालकांनी घ्यावयाची दक्षता

१४ अ. मुलीच्या शालेय किंवा महाविद्यालयीन जीवनाविषयी जाणून घ्या !

१. मुलीच्या दैनंदिन वागण्यावर लक्ष ठेवा. तिच्या शाळा किंवा महाविद्यालय यांच्या वेळांची नोंद स्वतःजवळ ठेवा !

२. मुलीचे मित्र आणि मैत्रिणी यांचे संपर्क क्रमांक स्वतःकडे असू द्या. वेळोवेळी त्यांच्याकडून स्वतःच्या मुलीच्या वर्तनाविषयी जाणून घ्या !

३. 'स्कार्फ' बांधल्याने दुचाकीवरील 'लव्ह जिहादी'च्या मागे बसलेल्या मुलीला ओळखणे कठीण जाते, हे लक्षात ठेवून तिच्या 'स्कार्फ' बांधण्याविषयी दक्षता घ्या.

४. महाविद्यालयातील कार्यक्रमांत अन्य मुलांसह मुलगी सहभागी होत

Scanned by CamScanner

असल्यास, त्याविषयी जाणून घ्या !

५. माध्यमिक शाळा आणि महाविद्यालय यांच्या परिसरात घुटमळणाऱ्या अनोळखी मुसलमान युवकांची माहिती त्वरित हिंदुत्ववादी संघटनांना द्या !

१४ आ. मुलीला सुखसुविधांची साधने विचारपूर्वक उपलब्ध करून द्या !

१. नवी वेषभूषा, अलंकार, महागडा 'मोबाईल', 'कॅमेरा' आदी वस्तूंची मुलीला असलेली आवश्यकता अभ्यासून मगच त्या तिला उपलब्ध करून द्या !

२. 'लव्ह जिहाद'ची काही प्रकरणे ही 'मोबाईल'च्या साहाय्याने घडली असल्यामुळे 'आपल्या मुलीच्या 'मोबाईल'वर कोणाचे दूरध्वनी येतात', याची अधूनमधून पडताळणी (तपासणी) करा ! मुलीच्या 'मोबाईल'मध्ये 'सेव्ह' केलेला 'लव्ह जिहादी' मुलाचा क्रमांक खोट्या नावाने असू शकतो, हेही लक्षात असू द्या !

१४ इ. मुलीशी सातत्याने सुसंवाद साधून तिला मनमोकळे बोलू द्या !

१. वयात येण्याच्या काळात मुलीत शारीरिक अन् मानसिक पालट होत असतात. या काळात तिला प्रेमाने वागवा. तिच्यामध्ये आपलेपणाची भावना निर्माण करा !

२. प्रतिदिन मुलीशी थोडा वेळ अनौपचारिक संवाद साधून तिच्या मनातील जाणा अन् तिने सहज संवाद साधावा, असे कौटुंबिक वातावरण निर्माण करा !

१४ ई. लहानपणापासून मुलीला धर्मशिक्षण देऊन सुसंस्कारित करा ! : धर्मशिक्षणाचा अभाव आणि हिंदु धर्माचे श्रेष्ठत्व न समजणे यांमुळे हिंदु मुली धर्मांतरित होतात, यासाठी –

१. लहानपणापासून मुलीवर हिंदु धर्मातील कौटुंबिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आध्यात्मिक नीतीमूल्यांचे संस्कार करा !

२. हिंदु कुटुंबात आणि हिंदुस्थानात जन्म झाल्याचा अभिमान मुलीमध्ये जागवा !

३. हिंदु सभ्यतेला साजेल, अशी वेशभूषा परिधान करण्याची आवड मुलीमध्ये निर्माण करा !

४. धर्मसत्संग, राष्ट्रपुरुषांविषयीचे कार्यक्रम आदी उपक्रमांमध्ये भाग घेण्यासाठी मुलीला प्रोत्साहन द्या !

५. हिंदु संस्कृती, हिंदु धर्मातील ग्रंथ, हिंदु धर्माचा इतिहास, हिंदु धर्माचे श्रेष्ठत्व

Scanned by CamScanner

आदी गोष्टींचे महत्त्व मुलीला समजावून सांगा !

६. मुलीला हिंदु धर्माचे तत्त्वज्ञान आणि आध्यात्मिक परंपरा यांचे शिक्षण म्हणजेच धर्मशिक्षण द्या आणि धर्माचरणी बनवा !

१४ उ. मुलीला मुसलमान स्त्रीच्या यातनामय जीवनाची ओळख करून द्या ! : बहुपत्नीत्व, बुरखा, तलाक, आर्थिक परावलंबित्व, मारहाण आणि मुलांचे लटांबर, हे मुसलमान स्त्रीच्या वाट्याला असलेले दैनंदिन भोग आहेत. त्याची जाणीव प्रत्येक हिंदु पालकाने त्यांच्या मुलींना वयात येण्याच्या काळात करून द्यायला हवी. - डॉ. श्रीरंग गोडबोले, पुणे. (७५)

१४ ऊ. 'लव्ह जिहाद'च्या धोक्याची ओळख मुलीला करून द्या ! : 'मुलीला केवळ हिंदु धर्माची महती सांगितल्याने धर्मांतरे थांबणार नाहीत. ती थोपवण्यासाठी 'लव्ह जिहाद'च्या धोक्याची ओळख मुलीला करून द्या.' - श्री. समीर दरेकर (७६)

१४ ए. 'लव्ह जिहाद'ला बळी पडू शकणारी किंवा बळी पडलेल्या मुलीचे रक्षण असे करा ! : 'लव्ह जिहाद'ला बळी पडू शकणाऱ्या किंवा बळी पडलेल्या हिंदु मुलींची वर्गवारी आणि त्यावरील उपाय पुढे दिले आहेत.

१४ ए १. स्वाभाविक मैत्रीच्या भावनेने मुसलमान मुलांच्या संपर्कात असणारी मुलगी : अशा मुलीमध्ये तिच्या हिंदु मैत्रिणी, मित्र, प्राध्यापक आणि पालक यांच्या साहाय्याने जागृती करावी.

१४ ए २. मुसलमान मुलांशी असलेल्या दाट मैत्रीमुळे त्यांच्याशी शारीरिक जवळीक निर्माण झाल्याने सारासार विचार गमावलेली मुलगी : अशा मुलीवर वशीकरण किंवा करणी यांचा प्रयोग झाला आहे, असे वाटल्यास या पुस्तकातील अनुक्रमांक '७ क २' मध्ये सांगितल्याप्रमाणे आध्यात्मिक उपाय करावेत. नंतर मुलीचा सुयोग्य हिंदु मुलाशी विवाह करावा.

१४ ए ३. पळवून नेलेली मुलगी : पालकांनी पोलिसांत तक्रार नोंदवावी. हिंदु मुलीचे वय १८ वर्षांहून अधिक असेल, तर 'ती तिच्या इच्छेने पळून गेली', असे नोंदवून पोलीस अदखलपात्र गुन्हा नोंदवतात. त्यामुळे गुन्हा नोंदवतांनाच 'मुलीला पळवून नेले', असे पालकांनी सांगणे आवश्यक आहे.

Scanned by CamScanner

१४ ए ४. 'लव्ह जिहादी'कडून फसवणूक झाल्याचे ओळखून परत आलेली मुलगी : अशा मुलीचा विवाह आणि धर्मांतर झाले असल्यास त्याविषयीच्या कायदेशीर अडचणी सोडवून तिला स्वधर्मात विधिवत प्रवेश द्यावा. अशा मुलीचा आत्मविश्वास हरवलेला असल्याने तिला समुपदेशन करण्यासाठी मानसोपचारतज्ञाचे साहाय्य घ्यावे.

१५. हिंदु समाजाला आवाहन

१५ अ. हिंदु मुलींचा मौल्यवान ठेवा जपून आपला सांस्कृतिक वारसा वाचवा ! : 'हिंदु स्त्रीमुळे हिंदुस्थानातील नैतिकता आणि संस्कृती जपली गेली आहे. हिंदु मुली या हिंदु संस्कृतीतील गुणसूत्रांच्या अधिकोष (जीनबँक) आहेत. त्यांचा अन्य पंथियांशी विवाह होऊ देणे, म्हणजे हिंदु वंशवृद्धीची बहुमोल गुणसूत्रे दुसऱ्यांना देणे होय. असे होऊ देऊ नका. आपला सांस्कृतिक वारसा वाचवा.' (७७)

१५ आ. हिंदूंनो, 'लव्ह जिहाद' हे हिंदु धर्मावरील वांशिक आक्रमण असल्याने आपल्या भागातील 'लव्ह जिहाद'चा कट उधळून लावण्यासाठी संघटितपणे पुढाकार घ्या !

१५ इ. 'हिंदूंनो, 'माझ्या ओळखीची कुठलीही हिंदु मुलगी मी 'लव्ह जिहाद'ला बळी पडू देणार नाही', अशी शपथ घ्या !' (७८)

१५ ई. धर्मांतरित झालेल्या; पण हिंदु धर्मात पुनर्प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या मुलींना स्वधर्मात स्थान द्या ! : 'अनेकदा धर्मांतरित असाहाय्य मुली परत येण्यास सिद्ध असूनही त्यांना हिंदु समाज स्वीकारत नाही. धर्मशत्रूंविरुद्ध बंड करून हिंदु मुलगी परत घरापर्यंत पोहोचली, यातच तिने तिचा हिंदु अंश दाखवला असल्याने तिला हिंदु समाजाने निःसंकोचपणे स्वधर्मात पुनर्प्रवेश देऊन धर्मांध मुसलमानांवर दडपण आणायला हवे. आमच्यातील हिंदु युवकांनी अशा पीडित मुलींशी विवाह करण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा. तसेच त्यांच्या नव्या संसाराचे दायित्व आर्थिकदृष्ट्या सक्षम हिंदूंनी घेतले पाहिजे.' - श्री. समीर दरेकर (७९)

१५ ई १. शुद्धीकरणासाठी संपर्क : मसुराश्रम, पांडुरंग वाडी, गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०००६३. संपर्क - दू.क्र. २८७४१९९७.

Scanned by CamScanner

१६. हिंदु धर्मगुरूंना आवाहन !

'लव्ह जिहाद'च्या समस्येच्या संदर्भात प्रवचनकार, धर्मपिठे आणि साधू-संत यांचे दायित्व महत्त्वाचे आहे; कारण ते लाखोंच्या समुदायाला उपदेश करू शकतात. हिंदूंची घरे आणि वंश उद्ध्वस्त करणाऱ्या 'लव्ह जिहाद'चे वास्तव सर्वांसमोर आणण्यासाठी हिंदु धर्मगुरूंनी पुढाकार घेतला पाहिजे. ज्या क्षणाला इस्लामच्या इतिहासाची काळी पाने आणि आजचे भीषण वास्तव हिंदु धर्मगुरूंच्या प्रवचनांतून गाजू लागेल, त्या क्षणाला १,३०० वर्षांमधील हिंदु स्त्रियांच्या किंकाळ्यांचा प्रतिशोध घ्यायला आजचा हिंदु तरुण मागे-पुढे पहाणार नाही.' - श्री. समीर दरेकर (८०)

१७. 'लव्ह जिहाद'ला आळा घालण्याचे उपाय

१७ अ. 'लव्ह जिहाद'च्या धोक्याविषयी जागृती करणे : 'लव्ह जिहाद'च्या धोक्याविषयी शाळा, महाविद्यालये, महिला मंडळे, जातीसंस्था, व्यावसायिक केंद्रे, धार्मिक कार्यक्रम आदी माध्यमांतून जागृती करणे आवश्यक आहे.

१७ आ. 'लव्ह जिहाद'ला आळा घालण्यासाठी हिंदुस्थानातही इस्त्रायल-प्रमाणे कठोर कायदे हवेत ! : 'इस्त्रायलमध्ये ज्यू आणि मुसलमान यांच्या विवाहाला कायद्याने बंदी आहे. हिंदुस्थानातील 'लव्ह जिहाद' थांबवण्यासाठी इस्त्रायलप्रमाणे कठोर कायदे करण्याची आवश्यकता आहे. हिंदु धर्माभिमान्यांनो, यासाठी आपल्या भागातील लोकप्रतिनिधी आणि मंत्री यांना संघटितपणे निवेदने देऊन अशा प्रकारचा कायदा करण्याची मागणी करा.' (८१)

१७ इ. 'लव्ह जिहाद'वर स्वा. सावरकर यांच्या विचारांनुसार उपाय ! : 'आपल्या स्त्रिया शत्रूने पळवून नेल्या आणि बाटवल्या, तर त्यांची मुले आपले शत्रू बनतात; म्हणून त्या स्त्रियांना सोडवून परत आपल्या धर्मात घ्या', असे स्वा. सावरकर हिंदूंना सांगत. आपल्या मुली परधर्मात जाऊ न देण्यासाठी सदैव सावध रहाणे, हा जसा 'लव्ह जिहाद'ला पायबंद घालण्याचा एक मार्ग आहे, तसाच स्वा. सावरकरांच्या विचारांनुसार - 'लव्ह जिहाद'ला बळी पडलेल्या मुलींना सोडवून परत स्वधर्मात आणून त्यांची शुद्धी करून सामावून घेणे, हा 'लव्ह जिहाद'ला पायबंद घालण्याचा दुसरा मार्गही हिंदु समाजाने त्वरित अवलंबला पाहिजे !

।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।

Scanned by CamScanner

संदर्भसूची (कंसातील आकडे संदर्भक्रमांक आहेत.)

लव्ह जिहाद : दी न्यू फेस ऑफ टेरर. प्रकाशक : मीडिया डेस्क, हिंदु संगम, मुंबई - ७. (१, २, १९, २४, ३५, ३८, ४२, ४५, ४७, ४९, ६३, ६५, ७७)

साप्ताहिक 'राष्ट्रपर्व'. प्रकाशक : श्री. अशोक रेळेकर, गणाचारी गल्ली, बेळगाव.
(४, ७, ७१) ३१.१.२०११ (३, ५, ३४, ७२, ७४) १५.६.२००९
(८, २१, २७, ६८) २२.६.२००९ (२३, ३७, ४०) १८.१.२०१०
(६७, ७३) १३.७.२००९

साप्ताहिक 'इंडिया टुडे'. प्रकाशक : दि इंडिया टुडे ग्रुप. संपादक : श्री. अरुण पुरी. लिव्हिंग मिडिया इंडिया लि., कनॉट प्लेस, नवी दिल्ली - १.
(६, १८, २२, २८, ६१, ७०) १०.११.२०१०

साप्ताहिक 'विवेक'. प्रकाशक : हिंदुस्थान प्रकाशन संस्था, प्रभादेवी, मुंबई.
(९, ४१, ४६, ५६, ७५) ८.११.२००९

'लव्ह जिहाद : मिथ ऑर रिॲलिटी'. प्रकाशक : 'व्हॉइस ऑफ जस्टीस', चेन्नई.
(१०, १३, १६, २०, २५, ३०, ३३, ५२, ५३, ६२)

दैनिक 'सनातन प्रभात'. संपादक अन् प्रकाशक : श्री. पृथ्वीराज हजारे, पत्रपेटी क्र. ४६, फोंडा, गोवा.
(११) १८.२.२०११ (१४, ३६, ३९, ४३) ११.७.२०१०
(१५) १८.२.२०११ (२९, ३१, ५९) २२.८.२०१० (२६) ८.६.२००९
(४४) २.३.२००९ (५०, ६४) १७.१२.२००९ (५१) २७.७.२०१०
(५४) ९.६.२०१० (५५) २९.११.२००९ (५७) ६.७.२००९
(५८) १८.८.२०१० (६६) २२.४.२००९ (८१) ३.८.२००९

साप्ताहिक 'जैन ॲनॅलिसिस अँड इन्टरनॅशनल न्यूज'. वर्ष १, अंक २३. प्रकाशक : सौ. रोशनी छाजेड, बी-७, महावीर पार्क, पुणे - ३७. (१२, ६०, ७८)

साप्ताहिक 'वज्रधारी'. प्रकाशक : दत्तकुमार खंडागळे, विटा, सांगली.
वर्ष ५, अंक ९ (१७, ४८, ६९, ७६) वर्ष ५, अंक १० (७९, ८०)

मासिक 'हिंदूबोध'. डिसेंबर २०१० (३२)

Scanned by CamScanner

卐 लेखकांचा परिचय 卐

श्री. रमेश हनुमंत शिंदे

(प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती, महाराष्ट्र, गोवा आणि गुजरात राज्य)

श्री. रमेश शिंदे हे गेली १५ वर्षे हिंदु धर्मप्रसाराचे कार्य करत आहेत. त्यांनी 'बुद्धीप्रामाण्यवाद्यांचा अहंकार', 'मनुस्मृति जाळावी कि अभ्यासावी ?' अन् 'धर्मशिक्षण फलक' या ग्रंथांचे संकलन केले आहे. ते विविध वृत्तपत्रांत हिंदु धर्माविषयी लिखाणही करतात. 'सह्याद्री', 'आयबीएन् लोकमत', 'झी २४ तास' आदी वाहिन्यांवरील चर्चासत्रांमध्ये त्यांनी हिंदु धर्माची बाजू प्रभावीपणे मांडली आहे. ४०० हून अधिक हिंदु धर्मजागृती सभांमध्ये त्यांनी धर्मजागृतीपर मार्गदर्शन केले आहे.

हिंदुसंघटन आणि धर्मजागृती या कार्यांसाठी महत्त्वपूर्ण योगदान दिल्याने वर्ष २००६ मध्ये त्यांना 'आंतरराष्ट्रीय प्रतिभा अकादमी'कडून 'सनातन धर्मभूषण', वर्ष २००८ मध्ये 'पितांबरी उद्योग समूहा'कडून 'प्रेरणा पुरस्कार' आणि २०.३.२०११ या दिवशी पुणे येथील 'हिंदु स्वाभिमान प्रतिष्ठान'च्या वतीने 'हिंदु कुलभूषण पुरस्कार' देऊन गौरवण्यात आले आहे.



श्री. मोहन अज्जू गौडा

(प्रवक्ते, हिंदु जनजागृती समिती, कर्नाटक)

श्री. मोहन गौडा हे गेल्या ७ वर्षांपासून कर्नाटक राज्यात 'हिंदु जनजागृती समिती'च्या माध्यमातून धर्मजागृतीचे कार्य करत आहेत. आरंभी युवासंघटनाचे कार्य केल्यानंतर २००७ पासून ते राज्यस्तरावर समितीचे संघटक म्हणून कार्य पाहू लागले. २००९ पासून ते समितीचे कर्नाटक राज्य प्रवक्ते म्हणून कार्यरत आहेत. कर्नाटक राज्यात घेतल्या जाणाऱ्या हिंदु धर्मजागृती सभांमध्ये ते धर्मजागृतीपर मार्गदर्शन करण्याची सेवा करतात .

Scanned by CamScanner

हिंदु जनजागृती समिती

महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी
कटिबद्ध समितीची महिला शाखा

रणरागिणी

महिलांना धर्मशिक्षण व स्वरक्षण प्रशिक्षण

हिंदु भगिनींनो, 'अबला' नको, 'सबला' व्हा, 'रणरागिणी' बना !

समितीचे धर्मजागृतीचे कार्य व चळवळी

- देशभरात १००० 'हिंदु धर्मजागृती सभां'चे आयोजन
- हिंदूंसाठी ७०० हून अधिक धर्मशिक्षणवर्गांचे आयोजन
- देवतांचे विडंबन व विकृत इतिहास यांविरुद्ध चळवळ
- हिंदुविरोधी कायद्यांना विरोध अन् मंदिररक्षण चळवळ

'लव्ह जिहाद'च नव्हे, तर प्रत्येक हिंदुविरोधी
घटनेविषयी जागृती करणारे संकेतस्थळ

www.HinduJagruti.org

प्रतिमाह १.४ लाखाहून अधिक वाचक !

- देवतांचे विडंबन अन् राष्ट्रावरील आघात रोखण्याविषयी 'ऑनलाईन' चळवळी
- नामजप, आरती आदींचे 'ऑडीओ' अन् सण, धार्मिक कृती आदींचे 'व्हीडीओ'

संपर्क : मुंबई ९३२२५३३५९५, संगणकीय पत्ता : pravakta@hindujagruti.org

Scanned by CamScanner